
परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...
# संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in
9881265102
संपादक - मोहन व्हावळे




बीड | वर्षे- 10 वे | अंक क्र. 163 | बुधवार दि. 25 जुन 2025 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

# शक्तिपीठ महामार्गास 2 मंत्र्यांचा विरोध, मंत्रिमंडळ बैठकीत पडसाद;

## राजू शेट्टी म्हणाले, शेतकऱ्यांनो दगडं तयार ठेवा



मुंबई : विधानसभा निवडणुकांपूर्वी शक्तिपीठ महामार्गास (Shaktipeeth) विरोध लक्षात घेता सावध भूमिका घेणाऱ्या महायुती सरकारने अखेर महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग - पवनार (जि.वर्धा) ते पत्रादेवी (जि. सिंधुदुर्ग) या महाराष्ट्र गोवा सरहद्द शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गास मान्यता दिली आहे. राज्यातील साडेतीन शक्तिपीठ, दोन ज्योतिर्लिंग आणि पंढरपूर, अंबेजोगाई सहित 18 तीर्थक्षेत्रांना जोडणारा हा शक्तिपीठ महामार्ग आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (Devendra Fadnavis) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ बैठकीत या प्रकल्पाच्या आखणीस तसेच भूसंपादनासाठी 20 हजार कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली आहे. मात्र, या महामार्गास कोल्हापूर, धाराशिव, सोलापूर येथील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला आहे. त्यामुळेच, कोल्हापूर जिल्ह्यातील दोन मंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीत शक्तिपीठ महामार्गावरुन नाराजी व्यक्त केली. तर, शेतकरी नेते राजू शेट्टींनीही (Raju shetty) कडक शब्दात इशारा दिला आहे. महायुती सरकारचा ड्रिम प्रोजेक्ट शक्तिपीठ महामार्गाबाबत कॅबिनेटमध्ये नाराजी नाट्य पाहायला मिळालं. शक्तिपीठ महामार्गाला शेतकऱ्यांचा होणारा विरोध लक्षात घेता कोल्हापूर जिल्ह्यातील मंत्री प्रकाश आबिटकर आणि हसन मुश्रीफ यांनी कॅबिनेटमध्ये नाराजी व्यक्त केली. पान 3 वर

# अजित पवारांच्या खात्यांवर लक्ष ठेवा, त्यांच्याकडे 14-14 हजार कोटींचे दोन निधी

## ➔ एकनाथ शिंदेंचे सेना आमदारांना आदेश



मुंबई : अजित पवार निधी देत नाही असा नाराजीचा सूर लावलेल्या शिवसेनेच्या मंत्र्यांना एकनाथ शिंदे यांनी आदेश दिला आहे. अजित पवारांच्या खात्याकडे मोठा निधी आहे, त्यावर लक्ष ठेवा. तो निधी कुठे वितरित होतो याची माहिती घ्या असा आदेश एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या मंत्र्यांना दिल्याची माहिती आहे. कॅबिनेटच्या बैठकीनंतर एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांची वेगळी बैठक घेतली. त्यामध्ये निधी वाटपावरुन शिंदेंच्या मंत्र्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्याची माहिती आहे.

महायुती सरकारच्या तीन घटक पक्षांमध्ये निधी वाटपासंबंधी सातत्याने धुसफूस पान 3 वर

थोडक्यात घडामोडी

# मराठवाड्यात पुढील चार दिवसांत पाऊस



परभणी : खरिपाच्या पेरणीनंतर सर्वत्र पावसाची प्रतीक्षा असताना उद्या, बुधवारी मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असून जालना, नांदेड, परभणी, हिंगोली, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये पाऊस होईल तर गुरुवारी छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यात मेघगर्जनेसह हलक्या व मध्यम स्वरूपाच्या सरी बरसण्याची शक्यता आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या हवामान विभागाच्या वतीने देण्यात आलेल्या अंदाजानुसार बुधवारी व गुरुवारी (दिनांक 25, 26) तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर शुक्रवारी, शनिवारी (दि.27 व 28) तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यात पुढील चार ते पाच दिवसांत कमाल व किमान तापमानात फारशी तफावत जाणवणार नाही. विस्तारित अंदाजानुसार मराठवाड्यात दिनांक 26 जून ते 3 जुलैदरम्यान पाऊस सरासरीएवढा, कमाल तापमान व किमान तापमान सरासरीएवढे राहण्याची शक्यता आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी पान 3 वर

# संगम येथील दत्ता महाराज गिरी यांचे दु :खद निधन



परळी (प्रतिनिधी) मंगळवार रोजी संभाजीनगर हॉस्पिटलमध्ये सकाळी अकरा वाजता ज्योतमावळली काही दिवसांनी उपचार चालू असताना आज मंगळवार रोजी दुःखद निधन झाले सायंकाळी साडेपाच वाजता संगम येथे त्यांच्या रहात्याघरी अंत्यसंस्कार करण्यात आले दत्ता महाराज गिरी हे संगम दाऊतपूर, जिरेवाडी सेवा सहकारी सोसायटीचे व्हाईस चेअरमन होते संगम मधून परळी शहरांमध्ये जाऊन उद्योग चांगल्या पद्धतीने केला परळी शहरांमध्ये जाऊन नाव लौकीक केले व परळी तालुक्यामध्ये एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून ते प्रत्येकजणाच्या ओठावर दत्ता महाराज गिरी ओळख निर्माण केली अतिशय गुणी व्यक्तिमत्व म्हणून परिचित होते दत्ता महाराज यांचा स्वभाव गोड होता आज दत्ता महाराज यांना शेवटचा निरोप देण्यासाठी हजारोच्या संख्येने परळी शहर व तालुक्यातुन मित्र मंडळ आले दत्ता महाराज यांच्या अंत्यविधीला हजारो मित्रमंडळी उपस्थित होते संगम गावावर दुःखाचा डोंगर कोसळला असे उद्गार सामूहिक श्रद्धांजली वाहातांना कोकाटे महाराज म्हणाले दत्ता महाराज गिरी यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा एक मुलगी असा परिवार आहे दि.26 गुरुवार रोजी सकाळी 8:00 वाजता दूध पाजण्याचा कार्यक्रम होणार आहे तरी परळी तालुक्यातून व शहरातून मित्रपरिवारानी येऊन दत्ता महाराजांना श्रद्धांजली व्हावी दुध पाजण्यासाठी उपस्थित राहावे

# फडणवीसांच्या विजयासाठी निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी..” ; काँग्रेस नेत्याचा गंभीर आरोप!




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिंकवण्यासाठी निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी मॅचफिक्सिंग केली होती, असा थेट आरोप त्यांच्या विरोधात विधानसभेची निवडणूक लढणारे काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव प्रफुल गुडधे यांनी केला आहे. मुख्यमंत्र्यांच्या दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघात एकाच मोबाईल वरुन शंभर-शंभर मतदारांची नोंदणी करण्यात आली आहे. ती कोणत्या नियमात केली आणि त्याची शहनिशा निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी का केली नाही? असा सवाल उपस्थित करून त्यांनी ही निवडणूक बेकायदेशीर असल्याने रद्द करावी आणि नव्याने निवडणूक घ्यावी अशी मागणी केली. सोबतच त्यांनी भाजपच्या नेत्यांना निवडणूक पान 3 वर

# बच्चू कडूंसाठी हायकोर्टाचा दिलासा, बँकेच्या चाव्या सध्या तरी जवळच राहणार !




प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख आणि माजी आमदार बच्चू कडू यांना मुंबई उच्च न्यायालयाने तात्पुरता दिलासा दिला आहे. विभागीय सहनिबंधक प्रवीण फडणीस यांनी दिलेल्या अपत्रातेच्या आदेशाला उच्च न्यायालयाने दोन आठवड्यांची अंतरिम स्थगिती दिली आहे. त्यामुळे बच्चू कडू यांचे अमरावती जिल्हा बँकेचे संचालकपद आणि अध्यक्षपद कायम राहणार आहे.

एका आंदोलनादरम्यान नाशिक येथे 2017 मध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यात बच्चू कडू यांना 2021 मध्ये एक वर्षाच्या साध्या कारावासाची शिक्षा पान 3 वर



**बीड** - अंतरवली सराटी येथे आज मराठा समाजाची मुंबई मोर्चा संदर्भात बैठक पार पडली. यावेळी बैठकीस उपस्थित राहुन, संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या सोबत चर्चा करतांना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम पाटील, छावाचे गंगाधर काळकुटे, मराठा संघांचे विनोद इंगोलेसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# तृतीय भाषा अध्यापनात अडचणींचेच ‘धडे’! शिक्षण विभागाची निरीक्षणे; तज्ज्ञांचेही मत



पुणे : राज्यात राज्य मंडळाच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून तिसरी भाषा लागू करण्यात पालकांच्या संमतीपासून शिक्षकांचे प्रशिक्षण, भाषेनुसार शिक्षक उपलब्धता अशा अडचणींचे डोंगर असतील, असा ‘अभ्यास’ शिक्षण विभागानेच केल्याचे समजते. या आणि अन्य काही समस्या शिक्षण क्षेत्रातील अभ्यासक आणि तज्ज्ञांनीही अधोरेखित केलेल्या असल्याने पहिलीपासून तिसरी भाषा आणण्याच्या धोरणाचा सर्वंकषच फेरआढावा घेण्याची गरज स्पष्ट होत आहे.

‘तिसरी भाषा शिकण्यासाठी शाळेत किमान 20 विद्यार्थी नसतील, तर ती ऑनलाइन पद्धतीने शिकवावी लागेल. त्यासाठी शाळेत संगणक, पडदे, इंटरनेटची व्यवस्था असावी लागेल. ही व्यवस्था असली, तरी पान 3 वर

# नागपूर ते गोवा हे अंतर आता 8 तासांवर येणार, शक्तीपीठ महामार्गासाठी 20,787 कोटींची तरतूद




पत्रादेवी ( जि.सिंधुदुर्ग ) या महाराष्ट्र-गोवा सीमेला जोडणाऱ्या या महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग प्रकल्पाला गती मिळाली आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या खर्चाला मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यातील 12 जिल्ह्यांना जोडणारा हा द्रूतगती मार्ग 802.592 किलोमीटर लांबीचा असणार आहे. महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग राज्यातील वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग या 12 जिल्ह्यांना जोडणार आहे. पुढे तो कोकण द्रूतगती महामार्गास गोवा-महाराष्ट्र सीमेवर जोडला जाणार आहे. या पान 3 वर

# म.सा.प. परळी शाखेची नुतन कार्यकारिणी गठीत

## » अध्यक्षपदी विजय वाकेकर तर सचिवपदी प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड यांची निवड



परळी , दि.24/06/2025 (प्रतिनिधी) येथील मराठवाडा साहित्य परिषदेची बैठक ज्येष्ठ मार्गदर्शक बाळासाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नुतन कार्यकारिणी गठीत करण्यासाठी मंगळवार दि.24/06/2025 रोजी सायं. 5:30 वा. कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत केंद्रीय कार्यकारिणीच्या निर्देशानुसार पदाधिकारी निवडण्यात आले. त्यात अध्यक्ष म्हणून विजय वाकेकर , सचिवपदी प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड पान 3 वर

# नगरपालिकेच्या कचरा डेपोच्या धुराने गुदमरतोय परळीकरांचा श्वास

## वन्यप्राणी,पक्षीही धोक्यात, धुराचे लोट परळीच्या दिशेने







परळी वैजनाथ परळी शहराचा कचरा जमा होणाऱ्या कचरा डेपो मुळे मुक्त संचार करणाऱ्या वन्यप्राण्यांच्या पिण्याचे पाणी प्रदूषित होत आहेत तसेच कचऱ्यावर कुठलीही प्रक्रिया न करता आग लावली जात असल्याने अंबेवेस, गणेशपार सह गावभागावर विषारी धूर पसरत असल्याने यावर त्वरित उपाययोजना करावयात अशी मागणी भाजपाचे अश्विन मोगरकर यांनी केली आहे.

बालाघाटच्या रांगेत असलेल्या डोंगरावर परळी शहरातील सर्व कचरा गोळा करण्यात येतो. या कचऱ्यावर प्रक्रिया करून खत बनवण्यासाठी लाखो रुपये खर्च करून नगरपरिषदेने कचरा प्रक्रिया केंद्र उभे केले आहे. मात्र सध्या जमा झालेल्या कचऱ्यावर कुठलीही प्रक्रिया केली जात नसल्याने प्लास्टिक व हलका कचरा उडून डोंगरावर पसरत आहे.

कचरा डेपो शेजारी वनखात्याचे संरक्षित जंगल असून येथे मोर, हरीण, ससे व इतर वन्यप्राण्यांच्या मुक्त संचार असतो. येथील नैसर्गिक साठलेल्या पाण्यात हा कचरा मिसळून पाणी प्रदूषित होत असल्याने या वन्यप्राण्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. नगरपरिषद प्रशासनाला पान 3 वर

# संपादकीय

## तुही भाषा कंची?

बोबडे बोल बोलणाऱ्या इयत्ता पहिलीतील चिमुरड्यांवर तिसरी भाषा म्हणून हिंदी शिकण्याची सक्ती करुन राज्यात भाजप आपले भाषिक राजकारण पुढे रेटू पाहत आहे. त्याचवेळी केंद्रीय गृहमंत्री 'भारतात लवकरच असा काळ येईल, की ज्यांना आज इंग्रजी बोलण्याचा अभिमान आहे, त्यांना त्याची लाज वाटेल.' असे म्हणत आहेत. त्यांच्या या विधानात आश्चर्य असे काहीच नाही. कारण ही भूमिका भाजपच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाचे राजकारण पुढे नेणारीच आहे. पण त्यासाठी काळाचे चक्र उलटे कसे फिरवले जाणार आहे ते गृहमंत्र्यांनी सांगितले असते तर बरे झाले असते. कारण मुलांची इंग्रजीची भीती जावी यासाठी राज्यात पहिलीपासून इंग्रजी शिकवायला सुरुवात होऊनही जमाना उलटला. म्हणजे लहानपणापासून मुलांना नीट इंग्रजी यावे ही सरकारचीच अधिकृत भूमिका. मुले पहिलीपासून इंग्रजी शिकू लागली. याशिवाय देशभरही अनेक ठिकाणी इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत आणि आपल्या मुलांनी इंग्रजी शिकून पुढे जावे असे ज्यांना वाटते ते पालक आपल्या पाल्यांना आवर्जून इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालतात. त्यामुळे अनेक ठिकाणी प्रादेशिक भाषांच्या शाळांची पटसंख्या कमी होत गेली हा वेगळा चिंताजनक मुद्दा. पण आपल्याला इंग्रजी येत नाही, म्हणून आपण आर्थिक, सांस्कृतिक पातळीवर मागे पडलो, आपल्या मुलांवर मात्र ही वेळ येता कामा नये, इंग्रजी शिकून ती फर्ड्या इंग्रजीत बोलली पाहिजेत यासाठी या देशातला अगदी गरीब माणूसदेखील पोटाला चिमटा काढून मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालतो आणि ती आईबापांसमोर 'येस... नो' करायला लागली की अभिमानाने भरून पावतो आणि आता गृहमंत्री म्हणतात म्हणून त्याने पुढच्या काळात याच गोष्टीची लाज वाटून घ्यायची?

याव्यतिरिक्त गृहमंत्री अमित शहा आणखीही बरेच बोलले आहेत. पण ते सगळे कसे करायचे याबद्दल मात्र ते काहीच सांगत नाहीत. उदाहरणार्थ आपण पुन्हा एकदा आपल्या देशाचा कारभार आपल्या भाषेतून चालवू, असे त्यांचे म्हणणे आहे. भारतीय भाषांशिवाय आपण भारतीय राहू, असू शकत नाही. आपल्या भाषा आपल्या संस्कृतीचे दागिने आहेत आणि विदेशी भाषांमधून हा देश कधीच समजून घेता येणार नाही, असेही त्यांनी दिल्लीत पुस्तक प्रकाशन कार्यक्रमादरम्यान केलेल्या भाषणामध्ये म्हटले आहे. ही वाक्ये समारंभाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या एखाद्या ऐऱ्यागैऱ्या पाहुण्याने केली असती तर गोष्ट वेगळी. पण देशाचे गृहमंत्रीच 'आज ज्यांना इंग्रजी बोलण्याचा अभिमान वाटतो, त्यांना उद्या त्याच गोष्टीची लाज वाटेल'असे म्हणतात, तेव्हा त्यातून नेमके काय समजून घ्यायचे? भारतावर 150 वर्षे सत्ता गाजवून ब्रिटिश निघून गेले, पण इंग्रजी ही आज भारतात कोणत्याही भारतीय भाषेइतकीच महत्त्वाची भाषा झाली आहे, हे कोणीच नाकारू शकत नाही. कारण ती अपरिहार्यपणे आजच्या जगाची ज्ञानाची आणि अर्थकारणाची भाषा आहे. भारतीय भाषांचे महत्त्व कोणीच नाकारत नाही, पण फक्त मराठी, तमिळ किंवा उडिया भाषेतूनच शिकणार, इंग्रजीला हात लावणार नाही, असे म्हणून कोणी डॉक्टर होऊ शकतो का? आयटी इंजिनीयर होऊ शकतो का? सुंदर पिचाई तमिळ भाषेचाच आग्रह धरून आणि इंग्रजीची लाज वाटून घेत बसले असते तर गूगलचे सीईओ झाले असते का? हैदराबादचे सत्या नाडेला मायक्रोसॉफ्टचे सीईओ झाले असते का? इंद्रा नुयी पेप्सीच्या सीईओपदापर्यंत पोहोचल्या असत्या का? ही सहज आणि सतत लोकांच्या डोळ्यासमोर असणारी नावे. इंग्रजीच्या साहाय्याने आपला आवाका, कौशल्य वाढवत नेऊन आपला दबदबा निर्माण करणाऱ्या अशा किती तरी भारतीयांची उदाहरणे देता येतील. असे असताना इंग्रजीचा दुस्वास करा, ती येते याची लाज वाटून घ्या यातून काय साधायचे आहे?

एके काळी इंग्रज राज्यकर्ते होते, त्यामुळे इंग्रजी ही सत्ताधाऱ्यांची भाषा हे भारतीय जनमानसात पक्के बसले आणि इंग्रजी उत्तम येणारे आणि ती न येणारे असे वर्ग निर्माण झाले. इंग्रजी येणारे वरचढ ठरले आणि ती न येणाऱ्यांमध्ये न्यूनगंड निर्माण झाला हे सारे खरेच आहे. स्वातंत्र्यानंतर गेली 75 वर्षे या परिस्थितीत फारसा बदल झाला नाही, हेही खरेच. पण ही परिस्थिती बदलण्यासाठी इंग्रजी पूर्ण नाकारणे, हिंदीचे महत्त्व वाढवत नेणे हा मार्ग कसा असू शकतो? भारतातला उच्च वर्ग इंग्रजी न येणाऱ्यांना कमी लेखतो, हे खरेच आहे, पण मग या दोन वर्गांमधली दरी कमी करण्यासाठी जाणीवपूर्वक काही वेगळे प्रयत्न करणे हाच यातला मध्यममार्ग. तो न स्वीकारता इंग्रजीऐवजी हिंदी शिकलेले लोक देशाबाहेरच्या जगात कसे वावरणार? दक्षिणेतील राज्यांच्या प्रखर हिंदीविरोधाचे काय करणार? रशिया, फ्रान्स, चीन अशा देशांमध्ये इंग्रजी अजिबात बोलली, वापरली जात नाही, असे दाखले दिले जात असले तरी हे देश एक तर भारतासारखे बहुभाषिक नाहीत. त्यांना बाहेरच्या एखाद्या राज्यकर्त्याला सामोरे जावे लागले नाही.

# प्रसिद्धी आणि गुढतेचे वलय मृत्यूनंतरही कायम!

**[25 जून: मायकेल जॅक्सन पुण्यस्मरण.]**

_मृत्यूपश्चात देखील मायकेल जॅक्सनच्या ध्वनिफितींची विक्री, शिफारशी आणि मैफलींतून त्यांना मिळणारे वार्षिक मानधन सन 1989मध्ये सुमारे 125 दशलक्ष डॉलर्स होते. ऑगस्ट 2018मध्ये फोर्ब्स मासिकाच्या यादीनुसार त्यांची एकूण कमाई 4.2 अब्ज डॉलर्स झाली होती. सन 2016मध्ये जॅक्सन इस्टेटकडून वार्षिक एकूण कमाईची अंदाजे किंमत 825 दशलक्ष डॉलर्स इतकी होती, त्यामुळे सन 2019मध्ये फोर्ब्सने जॅक्सनना सन 2012 वगळता प्रत्येक वर्षी जगातील अव्वल कमाई करणारा मृत कलाकार म्हणून मान्यता दिली. सदर माहितीपूर्ण लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी प्रस्तुत करताहेत... संपादक._ मायकल जॅक्सन हे एक जगप्रसिद्ध अमेरिकन पॉप गायक, गीतकार आणि नर्तक. किंग ऑफ पॉप याबरोबरच द ग्लोव्ह वन, वॉको जॅको, एमजे, जॅको, मिकी माईक, ऍपलहेड, स्मिली अशा अनेक टोपणनावानेही ते प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म अमेरिकेतील शिकागोजवळील इंडियाना येथील गॅरी या गावात झाला. जॅक्सन स्ट्रीटवर एका श्रमिक वर्गातील आफ्रिकन-अमेरिकन कुटुंबामध्ये जन्मलेले मायकल हे जॅक्सन कुटुंबातील दहा मुलांपैकी आठवे मुलगे होते. त्यांना रेबी, लातोया आणि जेनेट या तीन बहिणी आणि जॅकी, टीटो, जर्माइन, मार्लन आणि रँडी हे पाच भाऊ. त्यांची आई कॅथरीन एस्तेर जॅक्सन या क्लॅरिनेट आणि पियानो वाजवत असत. त्यांचे वडील जोसेफ हे निवृत्त मुष्टियोद्धा होते. चरितार्थाकरिता ते क्रेन ऑपरेटरचे काम करीत. तसेच स्थानिक रिदम अँड ब्लूज बँडमध्ये गिटार वाजवित असत. जोसेफ आणि त्यांचे भाऊ ल्यूथर यांनी इतर सहकाऱ्यांसमवेत द फॅल्कन्स नावाचा बँड काढला. काही कालावधीनंतर तो बंद पडला; पण त्यांच्या गाण्याच्या तालमींमुळे या मुलांच्या मनात गायन, वादन यांबद्दल आकर्षण निर्माण झाले व त्यांचे संगीताचे उपजत कलागुण हळूहळू वाढीस लागले. त्यांच्या आईवडिलांनी त्यांना घरीच संगीताचे शिक्षण द्यायला सुरुवात केली. त्यांच्या वडिलांनी या भावंडांना गायन, नृत्य, प्रत्यक्ष रंगमंचावर कसे वावरावे, सादरीकरण कसे करावे यांचे प्रशिक्षण दिले; पण याचबरोबर या सर्व भावंडांचे बालपण त्यांच्या वडिलांच्या विक्षिप्त स्वभावामुळे अतिशय खडतर परिस्थितीतही गेले. यामुळे बहुतांशी मुलांचा स्वभाव विशेषत: मायकल यांचा स्वभाव काही प्रमाणात मनस्वी बनला. दि.29 ऑगस्ट 1958 रोजी शिकागो नजीक एका लहानश्या गावात मायकल जैक्सनचा जन्म झाला. आफ्रिकन-अमेरिकन कामगारवर्गाच्या कुटुंबात जन्मलेला तो जोसेफ वॉल्टर- जो जॅक्सन आणि कॅथरीन एथर स्क्रूज यांचा दहा मुलांपैकी आठवा होता. त्यांचे वडील स्टील गिरणी कामगार म्हणून काम करत असत, त्याची आई एक प्रामाणिक यहोवाची साक्षीदार होती. केथरीन या मायकलच्या आईला संगीताची फार आवड होती, मायकलला संगीताच्या आवडीचे बाळकडू हे घरातूनच मिळत गेले. अगदी लहानपणापासूनच ते संगीतप्रेमी होते. वडिलांच्या मार्गदर्शनाखाली मायकल आणि त्यांची चार भावंडे मिळून जॅक्सन ब्रदर्स या नावाने संगीताचे कार्यक्रम करीत होती. त्यावेळी मायकल 10 वर्षांचे होते. तत्कालीन तरुणांना आकर्षक वाटणारी दिलखेचक वेशभूषा आणि वेगळी केशभूषा- अफ्रोस-केसांची डोक्यावर गुच्छासारखी असणारी रचना, त्वेषाने आणि वेगवान हालचालींनी भरलेले नृत्य या वैशिष्ट्यांसह तरुण आणि उत्साही मंडळींनी भरलेला असा हा समूह अल्पावधीतच खूप यशस्वी झाला. पुढे त्यांच्या बँडचे नामकरण जॅक्सन-5 असे करण्यात आले. ऑगस्ट 1967मध्ये हार्लेम येथील सुप्रसिद्ध अपोलो थिएटरमध्ये त्यांना कार्यक्रम करण्याची संधी मिळाली. तेथील अमॅच्युअर शो या कार्यक्रमात भाग घेण्यास मिळणे, ही कलाकारांसाठी एक पर्वणी असायची. तेथील कार्यक्रमामुळे या बंधूंनाही प्रसिद्ध कलाकार म्हणून मान्यता मिळाली. स्टीलटाउन या संस्थेच्या नावाखाली पहिल्यांदा या बँडची बिग बॉय बॅक्ड विथ यू हॅव चेंज आणि वी डोन्ट हॅव टू बी ओव्हर 21 टू फॉल इन लव्ह, बॅक्ड विथ जॅम सेशन ही दोन गाणी ध्वनिमुद्रित झाली. यानंतर काही कालावधीतच अमेरिकेतील एक प्रसिद्ध ध्वनिमुद्रिका संस्था मोटाऊन रेकॉर्ड्स या संस्थेचे अध्यक्ष ज्युनिअर बेरी गॉर्डी यांनी या बँडबरोबर मोठ्या रकमेचा करार केला-1968. या संस्थेबरोबर जॅक्सन-5 यांनी आय वाँट यू बॅक, एबीसी, द लव्ह यू सेव्ह, आय विल बी देअर, ममाज पर्ल, नेव्हर कॅन से गुडबाय, मेबी टुमॉरो या अत्यंत यशस्वी ध्वनिमुद्रिका केल्या. आय वाँट यू बॅक हे या संस्थेबरोबरचे त्यांचे पहिलेच गाणे अतिशय लोकप्रिय झाले. अमेरिकेतील बिलबोर्ड्स टॉप 100- अमेरिकेतील सर्वांत लोकप्रिय ध्वनिमुद्रिका आणि गीतांची क्रमवारी प्रसिद्ध करणारे मान्यताप्राप्त साप्ताहिक या संगीत मानांकनात हे गाणे पहिल्या क्रमांकावर गेले. अमेरिकेत या गाण्याच्या संग्रहाच्या जवळपास वीस लक्ष आणि अमेरिकेबाहेर चार लक्ष प्रतींची तडाखेबंद विक्री झाली. पुढच्या एबीसी या संग्रहाच्या बावीस लक्ष प्रतींची विक्री झाली. मायकल जॅक्सन त्यांच्या नवीन कार्यक्रमाच्या तयारीत असताना त्यांना जोरात हृदयविकाराचा झटका आला. वयाच्या 50 व्या वर्षी अमरिकेतील कॅलिफोर्निया येथे हृदयक्रिया बंद पडल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. अतिरिक्त औषधांच्या सेवनामुळेही त्यांना हृदयविकाराचा झटका आला असावा, असे निदान करण्यात आले होते. मायकल जॅक्सन यांच्या जीवनावर आधारित विविध चित्रपट आणि माहितीपट तयार करण्यात आले आहेत. यामध्ये द विझ-1978, मायकल जॅक्सन थ्रिलर-1983, मेकिंग ऑफ मायकल-1983, मायकल जॅक्सन द लिजेंट-1988, कॅप्टन इ ओ-1986, मायकल जॅक्सन वन नाईट-1995, मायकल जॅक्सन नंबर वन्स-2003, मिस कास्ट अवे आणि द आयलँड गर्ल्स-2004, द वन-2004, मायकल जॅक्सन अनमास्क्ड-2009, मायकल जॅक्सन दिस इज इट-2009, मायकल जॅक्सन व्हिजन-2010, बॅड 25-2012, मायकल जॅक्सन द लास्ट फोटो शूट-2014 इत्यादींचा समावेश आहे. जगाला विद्युत शॉक देणारा दिवस म्हणजे दि.25 जून 2009 रोजी लॉस एंजेलिस येथे दुपारी 2:26 वा. अचानक दूरचित्र वाहिन्यांवर वृत्त झळकायला लागलं. मायकेल जॅक्सन यांचं निधन!.. अनेकांसाठी तो खूप मोठा धक्का होता. या धक्क्यानं अमेरिकेत अनेक लोक रस्त्यावरच बेशुद्ध पडले. काही मिनिटांतच सोशल मीडिया वेबसाईट्स क्रॅश झाल्या. नैराश्यात गेल्यानं 13 जणांनी आत्महत्या केली! सुसाईड प्रिव्हेन्शन हॉटलाइनवरही जगभरात शेकडो कॉल आले. हॉटलाइनवर असलेल्या तज्ज्ञांनी त्यांना कसंबसं आत्महत्येपासून परावृत्त केलं. त्यांच्याभोवती असलेलं प्रसिद्धीचं आणि गूढतेचं वलय त्याच्या मृत्यूनंतरही कायम होतं. ज्या दिवशी त्याचा मृत्यू झाला, तो दिवस तर त्याचे चाहते आजही विसरलेले नाहीत.!! या लेखप्रपंचातून पॉप गायक मायकेल जॅक्सन यांना स्मृतिदिनानिमित्त करोडो विनम्र अभिवादन !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी,**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सअॅप- 9423714883.**

# करिअर संधी, तयारी आणि बॅकअप: यशाचा त्रिसूत्री मार्ग

**डॉ. भारत कऱ्हाड**

आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात करिअर निवडणे, घडवणे आणि त्यात यश मिळवणे हा एक अविरत प्रवास झाला आहे. पूर्वी केवळ पदवी मिळवली की चांगली नोकरी मिळते अशी सरधोपट गणिते होती. मात्र आता या संकल्पना बदलल्या आहेत. स्पर्धा वाढली आहे, संधींचे स्वरूप बदलले आहे आणि करिअरची परिभाषा विस्तारली आहे. आज करिअरमध्ये यश मिळवण्यासाठी संधी ओळखणे, योग्य तयारी करणे आणि बॅकअप प्लॅन तयार ठेवणे हे त्रिसूत्री मार्गदर्शक तत्त्व बनले आहे.संधी सगळ्यांना असते, ओळखणाऱ्याचे यश:

आजच्या काळात विविध क्षेत्रात करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. माहिती तंत्रज्ञान (IT), बँकिंग, बायोटेक्नॉलॉजी, ऑटोमोबाईल, टूरिझम, मेडिकल, फार्मास्युटिकल, मॅनेजमेंट, डिजिटल मार्केटिंग, डेटा सायन्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), ब्लॉकचेन अशा अनेक क्षेत्रांमध्ये दररोज नवी दारे खुली होत आहेत. परंतु या संधींचा लाभ घेण्यासाठी त्यांची ओळख आणि त्यांच्याकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी आवश्यक आहे.

संधी सर्वांनाच मिळतात, पण त्या संधी कोण ओळखतो आणि त्यावर कोण काम करतो हेच यश निश्चित करते. संधींच्या शोधात राहणाऱ्या आणि स्वतःला त्या योग्य बनवणाऱ्या व्यक्तीच भविष्यात यशस्वी होतात. 'सर्वांना संधी असली तरी तिचा खरा उपयोग करणारा यशस्वी होतो' हे वास्तव आज प्रत्येकाने लक्षात घेतले पाहिजे.सतत नवीन कौशल्ये शिकण्याची गरज:

आताच्या युगात केवळ शालेय किंवा महाविद्यालयीन शिक्षण पुरेसे नाही. नोकरी मिळवण्यापेक्षा नोकरी टिकवणे, वाढवणे आणि बदलत्या काळानुसार स्वतःला योग्य बनवणे जास्त महत्त्वाचे झाले आहे. त्यासाठी सतत नवीन कौशल्ये शिकणे हा एक अपरिहार्य भाग बनला आहे.

विशेषतः डिजिटल कौशल्ये, डेटा ॲनालिटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सिक्युरिटी, वेब डेव्हलपमेंट, डिजिटल मार्केटिंग, परदेशी भाषा यांसारख्या नव्या कौशल्यांना प्रचंड मागणी आहे. या कौशल्यांमध्ये पारंगत असलेले उमेदवार नोकरीच्या बाजारात अधिक स्पर्धात्मक ठरतात.आज अनेक नोकरदार व्यक्तीदेखील स्वतःच्या कौशल्यांमध्ये सातत्याने भर घालत आहेत. कारण उद्योगजगतातील प्रचंड स्पर्धेमुळे जो नवनवीन तंत्रे शिकतो तोच टिकतो. कंपनीत किंवा कोणत्याही संस्थेत काम करत असताना नवे कोर्सेस, ऑनलाईन प्रशिक्षण, सर्टिफिकेशन यांचा लाभ घेत स्वतःला सतत अद्ययावत ठेवणे हे काळाची गरज बनली आहे.

नवे कौशल्य - करिअरचे संरक्षण कवच:ज्या व्यक्ती नवनवीन कौशल्य शिकतात, त्या करिअरमध्ये अधिक सुरक्षित असतात. कारण त्यांना पर्यायी संधी सहज मिळू शकतात. एका कामात अडचण आली तर दुसऱ्या पर्यायाची दारे उघडी ठेवण्याची क्षमता या कौशल्यांच्या माध्यमातून मिळते. म्हणून करिअरमध्ये स्थैर्य आणि विकासासाठी नवे कौशल्य आत्मसात करणे हा एक दीर्घकालीन गुंतवणुकीचा भाग आहे.बॅकअप प्लॅन- करिअरमध्ये सुरक्षिततेची हमी:

जसे कोणताही डेटा किंवा महत्त्वाची माहिती आपण बॅकअपमध्ये ठेवतो, तसाच करिअरमध्येही बॅकअप प्लॅन असणे अत्यंत गरजेचे आहे. आजच्या अस्थिर नोकरी बाजारात कोणताही व्यवसाय किंवा नोकरी कायमची सुरक्षित राहणार नाही, हे स्वीकारावे लागेल. जागतिक आर्थिक मंदी, तंत्रज्ञानातील बदल, अचानक येणाऱ्या महामारी, आणि उद्योग क्षेत्रातील घडामोडी या सगळ्या गोष्टींमुळे करिअरमध्ये अनिश्चितता निर्माण झाली आहे.म्हणूनच प्रत्येकाने बॅकअप प्लॅन तयार ठेवणे हे करिअर सुरक्षिततेचे महत्त्वाचे पाऊल आहे. बॅकअप प्लॅन म्हणजे दुसरा पर्याय. उदाहरणार्थ, एखादा व्यक्ती जर सॉफ्टवेअर डेव्हलपर असेल, तर त्याने डेटा सायन्स, फ्रीलान्सिंग किंवा डिजिटल मार्केटिंग सारख्या पर्यायांची तयारी करावी. नोकरी गेली किंवा उद्योग कोलमडला तरी त्याला दुसरा मार्ग सहज सापडेल.

बॅकअप प्लॅन कसा तयार करावा?

बॅकअप प्लॅन बनवताना काही महत्त्वाचे मुद्दे लक्षात घेतले पाहिजेत:स्वतःच्या आवडी आणि कौशल्यांवर आधारित पर्यायी करिअर निवडावे.त्या पर्यायासाठी आवश्यक असलेली कौशल्ये शिकण्यास सुरुवात करावी. ऑनलाईन कोर्सेस, सर्टिफिकेशन आणि लघुकालीन प्रशिक्षण कार्यक्रमांचा लाभ घ्यावा.

आपल्या आर्थिक गरजांचा विचार करून बॅकअप प्लॅनचा व्यावहारिक दृष्टिकोन ठेवावा.

किमान एक किंवा दोन पर्यायी करिअरच्या शक्यता तयार ठेवल्या पाहिजेत.

मानसिक आणि आर्थिक स्थैर्य:बॅकअप प्लॅन फक्त करिअरचा पर्याय नसतो, तर तो मानसिक आणि आर्थिक स्थैर्य मिळवण्याचे एक मजबूत साधन असतो. अचानक नोकरी गेल्यास किंवा उद्योगात नुकसान झाल्यास माणूस प्रचंड तणावाखाली जातो. पण जर त्याच्याकडे दुसरा पर्याय तयार असेल तर तो सहज सावरू शकतो आणि नव्या दिशा शोधू शकतो.

बॅकअप प्लॅन असल्यामुळे आत्मविश्वास वाढतो, धोके पत्करण्याची क्षमता वाढते आणि करिअरमध्ये प्रगतीची नवी दारे उघडतात. म्हणून बॅकअप प्लॅन हा फक्त पर्यायी मार्ग नसून, तो यशाचा अत्यावश्यक भाग आहे.

स्किल डेव्हलपमेंट संधींचा लाभ:सरकारकडून 'स्किल इंडिया', 'प्रधानमंत्री कौशल विकास योजना' अशा अनेक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना आणि नोकरदारांना विविध व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येत आहे. या योजनांमुळे आज अल्प खर्चात किंवा मोफत प्रशिक्षण मिळू शकते. अनेक ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर (जसे की SWAYAM, Coursera, edX, Udemy) देखील उच्च दर्जाचे कोर्सेस उपलब्ध आहेत.

विद्यार्थ्यांनी आणि नोकरदारांनी या संधींचा लाभ घ्यावा आणि स्वतःला सातत्याने अद्ययावत ठेवावे. सतत नवीन शिकणाऱ्या व्यक्तीच आजच्या स्पर्धेत यशस्वी ठरत आहेत.

यशाचा त्रिसूत्री मंत्र:

करिअर हा एक संधींचा, शिकण्याचा आणि स्वतःला घडवण्याचा प्रवास आहे. या प्रवासात यशस्वी होण्यासाठी तीन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत:

1. संधी ओळखणे आणि योग्य वेळी कृती करणे.

2. सतत नवीन कौशल्ये शिकत स्वतःला अद्ययावत ठेवणे.

3. सुरक्षिततेसाठी बॅकअप प्लॅन तयार ठेवणे.

संधी सर्वांनाच मिळतात, पण त्या ओळखून त्यांचे सोनं करणं हेच खऱ्या विजेत्याचं लक्षण आहे. बॅकअप प्लॅन ही केवळ पर्याय ठेवण्याची सवय नसून, तो आपल्या आयुष्याची, करिअरची आणि यशाची सुरक्षितता आहे. सतत शिकण्याची आणि बदलांना सामोरे जाण्याची तयारी ठेवली, तर करिअरमध्ये कितीही अडथळे आले, तरी यशस्वी होणे निश्चित आहे

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय,**
**दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# समाज म्हणून आपण कुठे चुकतोय?

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे, हे सत्य नाकारता येत नाही. परंतु, ही स्पर्धा जेव्हा 'जीवघेणी' होते आणि त्यातून आपलेच पाल्य मानसिक आणि भावनिक दृष्ट्या खचून जातात, तेव्हा समाज म्हणून आपण कुठे चुकतोय, याचा विचार करणे अनिवार्य ठरते. परीक्षांमधील गुण आणि यश-अपयशाचे गणित हे केवळ शैक्षणिकच नाही, तर सामाजिक, मानसिक आणि सांस्कृतिक पैलूंनी भरलेले एक जटिल कोडे आहे, ज्याची आज सखोल चिकित्सा रणे गरजेचे आहे.*गुणांचे जोखड आणि शिक्षणाचे बदललेले स्वरुप:- *शिक्षण हे व्यक्तीला सुज्ञाण नागरिक बनवण्यासाठी, विचारशक्ती विकसित करण्यासाठी आणि जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तयार करण्यासाठी असते. मात्र, आजच्या काळात शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ चांगले गुण मिळवून उच्च पगाराची नोकरी मिळवणे इतकेच मर्यादित राहिले आहे. 'टक्क्या-टक्क्यांची स्पर्धा' हे वास्तव इतके भीषण झाले आहे की, मुलांना एखाद्या शर्यतीतील घोड्याप्रमाणे वागवले जाते, जिथे अंतिम रेषा गाठणे हेच एकमेव ध्येय असते. एकीकडे अभ्यासक्रमाचा वाढता आवाका, तर दुसरीकडे अवाढव्य गृहपाठ आणि शिकवणी वर्गांचे ओझे यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले आहे. पालकांना वाटते की, त्यांचे मूल 'इतर मुलांपेक्षा' कमी पडू नये, आणि या अवाजवी अपेक्षेच्या ओझ्याखाली मुलांची नैसर्गिक आवड, त्यांची सर्जनशीलता आणि त्यांचा आनंद दबून जातो. "परीक्षेतील गुण म्हणजे आयुष्य नव्हे", हे साधे सत्यही आपण विसरत चाललो आहोत. शिक्षण हे माहितीचे स्रोत देत असेल, पण ते सुसंस्कृतपणा, भावनिक बुद्धिमत्ता (Emotional Intelligence) आणि ताण-तणावाला सामोरे जाण्याची क्षमता देत आहे का, हा प्रश्न आजही अनुत्तरित राहतो.

*प्रतिष्ठेची लढाई आणि तुलनात्मक जीवनशैली:-*आजच्या समाजात मुलांच्या गुणांवरून आणि त्यांच्या करिअरवरून पालकांची सामाजिक प्रतिष्ठा ठरवली जाते. "शेजारच्या अमुकने एवढे गुण मिळवले, तू का नाही घेऊ शकत?" अशा प्रकारच्या तुलनेमुळे मुलांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो. ही तुलना केवळ मुलांपुरतीच मर्यादित नसते, तर पालकांमध्येही 'माझे मूल तुझ्या मुलापेक्षा सरस आहे' अशी एक अदृश्य आणि जीवघेणी स्पर्धा सुरु होते. विशेषतः शिक्षक वर्गात ही स्पर्धा अधिक तीव्रतेने दिसून येते, कारण त्यांना शिक्षणाचे महत्त्व अधिक चांगल्या प्रकारे माहीत असते, पण तरीही ते या मानसिकतेतून बाहेर पडू शकत नाहीत, हे अधिक चिंताजनक आहे.

समाजाच्या या दबावामुळे पालक आपल्या मुलांची बुद्धिमत्ता, त्यांची कुवत आणि त्यांच्या आवडी-निवडी तपासत नाहीत. त्यांना फक्त इतरांच्या बरोबरीने किंवा त्यांच्यापेक्षा पुढे जायचे असते. याचे गंभीर परिणाम मुलांच्या मानसिकतेवर होतात. मुलांकडून होणारा अपेक्षाभंग केवळ त्यांना नैराश्याकडे घेऊन जात नाही, तर कधीकधी आत्महत्येसारख्या टोकाच्या आणि अस्वस्थ करणाऱ्या घटनांनाही कारणीभूत ठरतो. हे केवळ एक उदाहरण नसून, एका मोठ्या सामाजिक समस्येचे द्योतक आहे.

*ताण, डिप्रेशन आणि भावनिक अनावरता:-*

मुलांच्या आत्महत्येच्या बातम्या ऐकून मन सुन्न होते. ज्या मुलांमध्ये अभ्यासात उत्कृष्ट बुद्धिमत्ता, कष्ट आणि चिकाटी होती, त्यांच्यात ताण-तणावाला सामोरे जाण्याचा चिवटपणा का नव्हता, हा प्रश्न पडतो. याचा अर्थ असा नाही की, मुलांमध्ये लढण्याची वृत्ती नसते, तर अनेकदा पालकांच्या अवाजवी अपेक्षा आणि त्यातून येणारे अपयशाचे भय त्यांना भावनिक दृष्ट्या एकाकी पाडते.

पालकांनी मुलांना समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रत्येक मुलाची क्षमता वेगळी असते, त्याची आवड वेगळी असते. डॉक्टर-इंजिनिअर होण्याआधी त्यांना माणूस बनणे शिकवणे आवश्यक आहे. जीवनात येणाऱ्या सर्व संकटांना सामोरे जाण्यासाठी त्यांना मानसिकदृष्ट्या तयार करणे हे पालकांचे कर्तव्य आहे. गुणांपेक्षाही मुलाचे मानसिक आरोग्य आणि त्याचे भावनिक संतुलन अधिक महत्त्वाचे आहे. मुलांच्या मनातील भीती, ताण आणि नैराश्य वेळीच ओळखणे आणि त्यावर योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे. केवळ शिक्षण नव्हे, तर जीवन कौशल्ये (Life Skills) शिकवणे हे आजच्या काळाची खरी गरज आहे.

*सुसंस्कृतपणाचा अभाव आणि संवादहीनता:-*शिक्षणाने आपल्याला माहितीचे स्रोत दिले असतील, पण सुसंस्कृतपणा दिला का, हा प्रश्न गंभीर आहे. सुसंस्कृतपणा म्हणजे केवळ चांगले कपडे घालणे किंवा सभ्यपणे बोलणे नव्हे, तर दुसऱ्याच्या भावनांचा आदर करणे, सहानुभूती दाखवणे आणि समजूतदारपणाने वागणे. आजच्या पालकांमध्ये मुलांच्या आवडीनिवडी, त्यांच्या इच्छा जाणून घेण्याऐवजी केवळ आपले स्वप्न त्यांच्यावर लादण्याची प्रवृत्ती वाढली आहे. ही एक सांस्कृतिक पोकळी आहे, जिथे मूल्यांपेक्षा गुणांना अधिक महत्त्व दिले जाते.

पालक आणि पाल्यांमधील संवादाचा अभाव हे अनेक समस्यांचे मूळ आहे. जेव्हा मुलाला कळते की, आपले पालक आपल्याला समजून घेत नाहीत किंवा त्यांना केवळ गुणांमध्येच स्वारस्य आहे, तेव्हा तो त्यांच्याशी संवाद साधणे थांबवतो. यामुळे मुलांच्या मनात तयार होणारा भावनिक कोंडमारा त्यांना चुकीच्या दिशेने घेऊन जातो. सांस्कृतिकदृष्ट्या आपण मुलांना केवळ स्पर्धा करायला शिकवतो, पण त्या स्पर्धेच्या पलीकडे जाऊन माणूस म्हणून कसे जगावे, हे शिकवण्यात कुठेतरी कमी पडतो आहोत.

*पालकांच्या प्रशिक्षणाची गरज आणि सकारात्मक बदल:-*

या सर्व भीषण वास्तवावर मात करण्यासाठी पालकांच्या प्रशिक्षणाची नितांत गरज आहे. पालकांना हे समजून घ्यावे लागेल की, यशस्वी होण्याचे अनेक पर्याय असू शकतात. प्रत्येक मूल शर्यतीचा घोडा नसते. त्यांचे करिअर त्यांच्या आवडीनुसार निवडण्याचा अधिकार त्यांना मिळायला हवा.

*पालक म्हणून आपण काय करू शकतो?* 1.तुलना टाळा: आपल्या मुलाची तुलना इतरांशी करणे थांबवा. प्रत्येक मूल अद्वितीय आहे आणि त्याची स्वतःची ओळख आहे.

2.आवड ओळखा: मुलांच्या आवडी-निवडी आणि क्षमता समजून घ्या. त्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात प्रगती करण्यास प्रोत्साहन द्या, भलेही ते पारंपरिक करिअर मार्ग नसले तरी.3.संवाद साधा: मुलांशी मोकळेपणाने बोला. त्यांच्या समस्या ऐकून घ्या आणि त्यांना भावनिक आधार द्या. त्यांच्या लहानसहान गोष्टींनाही महत्त्व द्या. 4.अपयश स्वीकारायला शिकवा: अपयश ही यशाची पहिली पायरी आहे, हे त्यांना शिकवा. अपयशातून शिकण्याची संधी द्या, त्यांना पुन्हा प्रयत्न करण्यासाठी प्रेरित करा. 5.चांगले माणूस बनायला शिकवा: गुणांपेक्षाही चांगले संस्कार, माणुसकी आणि नैतिकता महत्त्वाची आहे, हे त्यांना समजावून सांगा.

6.स्वतः जागरूक रहा: पालक म्हणून आपण स्वतः जागरूक राहणे, मुलांना समजून घेणे आणि त्यांच्यावर अनावश्यक दबाव न टाकणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्या कृतीतून मुलांना आदर्श घालून द्या.

फक्त अशा घटना घडल्या की चर्चा होते आणि काही दिवसांतच ती विरघळून जाते, हे वास्तव बदलायला हवे. यावर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी शैक्षणिक संस्था, कुटुंब आणि समाज या सर्वांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. पालक आणि पाल्यांचे संबंध आनंदी आणि समजूतदार बनले तरच या समस्यांवर मात करता येईल आणि एक सुदृढ, मानसिकदृष्ट्या सक्षम आणि आनंदी पिढी घडवता येईल.



***प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे***

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

लोकसभा, विधानसभेला शक्तिपीठ महामार्गामुळे मोठा फटका बसल्याने स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन निर्णय होणे अपेक्षित असे मत कॅबिनेट बैठकीत या मंत्र्यांनी मांडल्याचे सूत्रांची माहिती आहे. 12 जिल्हे आणि 39 तालुक्यातून जाणारा शक्तिपीठ महामार्ग राज्यासाठी फायदेशीर आहे. मात्र शेतकऱ्यांचे नुकसान करणारा आहे. त्यामुळे, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि नगर पालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा विरोध सरकारला परवडण्याजोगा नाही, अशी भूमिका काही मंत्र्यांनी बैठकीत मांडली. मात्र, तरीही सरकार शक्तिपीठ महामार्गाच्या निर्णयावर ठाम असल्याची सूत्रांची माहिती आहे.महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ म्हणजे महाराष्ट्राचे मालक नव्हे, महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ म्हणजे लुटारुंचे टोळके झाले आहे. शक्तिपीठ महामार्ग म्हणजे 30 हजार कोटींमध्ये होणारा रस्ता 86 हजार कोटीवर नेला आहे. 50 हजार कोटी लुटण्याचा डाव आम्ही शेतकरी हाणून पाडू, अशा शब्दात शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी राज्य सरकारला इशारा दिला. तसेच, मोजणी करायला येणाऱ्यांना शेतकरी गोफनीच्या दगडाने धडा शिकवतील, शेतकऱ्यांनो आपली गोफण आणि दगडं तयार ठेवा. कोल्हापूर जिल्ह्याला महापुराच्या खाईत लोटणारा शक्तिपीठ महामार्ग आम्ही कदापी होऊ देणार नाही, असेही राजू शेट्टींनी म्हटले.शक्तिपीठ महामार्ग भूसंपादनास 20,000 कोटींची तरतूद मंत्रिमंडळाने केल्याच्या विरोधात अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष व शक्तिपीठ महामार्ग विरोधी आंदोलनाचे नेते राजन क्षीरसागर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. महाराष्ट्रातील शेतकरी या प्रकल्पास मान्यता देणार नाही, महाराष्ट्राला कर्जात बुडवणारा आणि शेतकऱ्यांना उध्वस्त करणारा हा प्रकल्प आहे. महाराष्ट्राच्या जमिनी कवडीमोल दराने घेण्याचा हा सरकारचा डाव आहे. पण, गोळीबार जरी केला तरी शेतकरी आपल्या जमिनी सोडणार नाही, असे क्षीरसागर यांनी म्हटले. विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन शासनाने शक्तीपीठ महामार्ग रद्द केल्याचे जाहीर केले होते. मात्र, विधानसभेतील बहुमतानंतर पुन्हा महामार्गाचे काम सुरु करणे म्हणजे शेतकऱ्यांची फसवणूक आहे. सरकार शेतकऱ्यांवर जाणीवपूर्वक अन्याय करत आहे, शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा यासाठी दोन वर्षांपासून आमचा संघर्ष सुरु आहे. शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, अशी मागणी धाराशिव येथील शेतकऱ्यांनी सरकारकडे केली आहे.

--------------------------------------

सुरु असल्याचं दिसून येतंय. त्यातही शिंदेंच्या शिवसेनेच्या मंत्र्यांनी अर्थमंत्री अजित पवार यांच्याविषयी अनेकदा नाराजी व्यक्त केली आहे. त्याच पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या मंत्र्यांची स्वतंत्र बैठक घेतली.राज्यातील निधी वाटपावरुन एकनाथ शिंदे आक्रमक झाल्याचं दिसून आलं. अजित पवारांच्या खात्यावर बारकाईनं लक्ष ठेवा असा आदेश त्यांनी मंत्र्यांना दिला. अजित पवारांच्या खात्यात 14-14 हजार कोटींचे दोन निधी आहेत. त्यावर लक्ष ठेवल् पाहिजे. हा निधी कुठे वितरीत होत आहे यांची माहिती आपल्याला मिळाली पाहिजे असं एकनाथ शिंदे म्हणाले. जे आपल्या हक्काचं आहे ते घेतलंच पाहिजे असा आदेश एकनाथ शिंदे यांनी मंत्र्यांना दिला. त्यामुळे आता अजित पवारांच्या अर्थखात्यावर शिवसेनेचा वॉच असेल अशी चर्चा सुरु आहे. अजित पवार आपल्याला निधी देत नाही अशी तक्रार करत शिवसेनेच्या मंत्र्यांनी या आधीही नाराजी व्यक्त केली आहे. शिवसेनेच्या मंत्र्यांनी या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचीही भेट घेतली होती. परंतु निधी हा काही आपल्या खिशातून देत नाही, राज्याच्या तिजोरीला शिस्त आणण्यासाठी काही पावले उचलली जातात असं अजित पवारांनी या आधी स्पष्ट केलं होतं.

------------------------------------------

आयोगाचे प्रवक्ते म्हणून काम करु नये, असा टोलाही लगावला.नागपूरमध्ये पत्रकार परिषदेत गुडधे म्हणाले, "लोकसभा ते विधानसभा निवडणुकीच्या पाच महिन्यांच्या कार्यकाळात दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघात तब्बल 33 हजार 612 मतदार वाढले. यापैकी ऑनलाईन आणि ऑफलाईन नोंदणीची आकडेवारी आपण माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागितली. मात्र याची एकत्रित माहिती आपल्याला दिली जात नाही. ऑनलाईन आणि ऑफलाईन अशी वेगवेगळी माहिती उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. या मतदारसंघात एकाच फोन नंबरवरुन 40 ते 100 जणांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. एकाच घरात शेकडो मतदार कसे काय आले?" असा प्रश्न गुडधे यांनी उपस्थित केला.

--------------------------------------

सुनावली आहे. सहकारी बँकेच्या नियमानुसार एक वर्षाची शिक्षा झाल्यास संबंधित व्यक्ती संचालक म्हणून अपात्र ठरतो. बच्चू कडूंनी या प्रकरणात यापूर्वी उच्च न्यायालयात धाव घेतली होती तेव्हा न्यायालयाने शिक्षेला स्थगिती न देता केवळ शिक्षा निलंबित केली होती.कायद्यानुसार स्थगिती मिळाली तरच संचालक म्हणून काम करता येते. हीच बाब हेरुन विरोधी गटाने सहकार विभागाकडे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार विभागीय सहनिबंधक प्रवीण फडणीस यांनी बच्चू कडूंच्या अपात्रतेचा निर्णय दिला. या निर्णयाविरोधात कडूंनी नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली. कडूंनी शिक्षेला स्थगिती आणि अंतरिम दिलासा देण्याची विनंती केली. परंतु, संचालक मंडळाने कॅव्हेट दाखल करून कोणताही निर्णय त्यांची बाजू ऐकल्याशिवाय देऊ नये, अशी मागणी केली होती.

--------------------------------------

तासिकेच्या वेळेत शिक्षक ऑनलाइन उपलब्ध असणे आवश्यक आहे. पहिलीच्या विद्यार्थ्यांचा वयोगट लक्षात घेता, ऑनलाइन तासिकेत त्यांचे लक्ष टिकवून ठेवण्यासाठी, आंतरक्रिया होण्यासाठी फार संधी नाही. एकाच वर्गातील विद्यार्थ्यांनी दोनपेक्षा अधिक भाषा तृतीय भाषा म्हणून निवडल्यास अध्ययन, अध्यापनाचे नियोजन जिकिरीचे होईल,' अशी निरीक्षणे शिक्षण विभागाचीही असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर दिली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'एखाद्या शाळेत जास्त पटसंख्या असल्यास तिसरी भाषा शिकवण्यासाठी एकापेक्षा जास्त कंत्राटी शिक्षक नेमावे लागतील. भाषानिहाय कंत्राटी शिक्षकांची उपलब्धता, निवड आणि नियुक्ती या बाबी तातडीने न झाल्यास अध्ययन-अध्यापनात अडचणी निर्माण होतील.'तिसऱ्या भाषेसाठी असलेल्या ऑनलाइनच्या पर्यायाबाबतही शिक्षण क्षेत्रातील अभ्यासकांना प्रश्न आहेत. 'ऑनलाइन शिकवणाऱ्या शिक्षकांची भाषानिहाय निवड करावी लागेल, त्यांना शाळा निश्चित करून द्याव्या लागतील. शिक्षक लवकर उपलब्ध न झाल्यास अडचण होऊ शकते. भाषानिहाय कंत्राटी, ऑनलाइन शिक्षकांसाठी भाषा अध्यापन प्रशिक्षण द्यावे लागेल. कंत्राटी, ऑनलाइन शिक्षकांसाठीचे मानधन निश्चित करून त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करावी लागेल,' असे तज्ज्ञांचे मत आहे.

-----------------------------------------------

महामार्गामुळे राज्यातील प्रमुख शक्तीपीठे माहुर, तुळजापूर आणि कोल्हापूर तसेच अंबेजोगाई ही तीर्थक्षेत्रे जोडली जाणार आहेत. तसेच संतांची कर्मभूमी असलेले मराठीचे आद्यकवी अंबेजोगाईस्थित मुकूंदराज स्वामी, जोगाई देवी तसेच 12 ज्योर्तिलिंगापैकी 2 औंढानागनाथ आणि परळी वैजनाथ, महाराष्ट्राचे आराध्य पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, यासह कारंजा-लाड, अक्कलकोट, गाणगापूर, नरसोबाची वाडी, औदुंबर ही दत्त गुरुंची धार्मिक स्थळे जोडली जाणार आहेत. या महामार्गामुळे नागपूर ते गोवा हे 18 तासांच्या प्रवासाचे अंतर 8 तासांवर येणार आहे.शक्तीपीठ महामार्ग प्रकल्पाच्या भूसंपादनाकरिता हुडकोकडून 12 हजार कोटींचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. या निधीतून सुमारे 7 हजार 500 हेक्टरचे भूसंपादन करण्यात येणार आहे. हा संपूर्ण प्रकल्प महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणार आहे. हा महामार्ग महाराष्ट्रातील शक्तीपीठांना एकत्र जोडण्याचा प्रयत्न असून, त्यातून पर्यटन, वाहतूक आणि ग्रामीण भागाचा विकास साधण्याचे उद्दिष्ट आहे.

----------------------------------------

, प्राचार्य अरुण पवार (उपाध्यक्ष ) , प्रा.संजय आघाव ( कोषाध्यक्ष ) ,दिवाकर जोशी (सहसचिव) , प्रा.डॉ.अर्चना चव्हाण (सहसचिव ) ,सिद्धेश्वर इंगोले ( प्रसिद्धी प्रमुख ),बालाजी कांबळे (संपर्कप्रमुख ) या प्रमुख पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.यावेळी पुढील पाच वर्षात साहित्य परिषदेची ध्येयधोरणे निश्चित करण्यात आली . निवडीनंतर सत्कारप्रसंगी बोलताना नुतन अध्यक्ष विजय वाकेकर यांनी पुन्हा एकदा मराठवाडा साहित्य परिषद परळी शाखेला सुवर्णकाळ प्राप्त करून देण्याचा मनोदय व्यक्त केला.यावेळी मराठवाडा साहित्य परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

-----------------------------------------

मात्र याचे कुठलेही सोयरसुतक नसल्याने भारताचा राष्ट्रीय पक्षी असलेला मोर ही या कचऱ्यावर दिसून येत आहे. पावसाळा सुरु झाल्याने डोंगरावर जागोजागी पावसाचे पाणी साचत आहे. या पाण्याचा उपयोग पिण्यासाठी वन्यप्राणी करत असतात. पुढील वर्षभर पिण्याच्या पाण्यासाठी नैसर्गिक पद्धतीने साचलेल्या या खड्ड्यावर वन्यप्राणी अवलंबून असतात. मात्र कचरा पाण्यात मिसळत असल्याने पाणीसाठे आत्तापासूनच दूषित होत आहेत.कचरा प्रक्रिया केंद्रात कुठलीही प्रक्रिया करत नसल्याने सर्वसामान्य कर भरणाऱ्या नागरिकां कडून वसूल केलेला कररुपी पैसा कचऱ्यात जात असल्याचा आरोपही अश्विन मोगरकर यांनी केला आहे. साठलेला कचरा पेटवला जात असल्याने विषारी धुर गावभागावर पसरत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत असून अंबेवेस गणेशपार सह गावभागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. परळी नगरपरिषद नागरिकांच्या आरोग्याशी खेळत असल्याचे दिसून येत आहे. या विषारी धुरामुळे श्वसनाचे रोग वाढण्याची शक्यता वाढली आहे. वृद्ध व लहान मुलांना याचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. परळीतील अनेक समस्यांनी नागरिक त्रस्त आहेत किमान नैसर्गिक अधिवासात रहाणाऱ्या वन्यप्राण्यांच्या जीवाशी खेळणे तरी परळी नगरपरिषदेने बंद करावे व कचऱ्यामुळे प्रदूषित होणाऱ्या वन्यप्राण्यांच्या पाणीसाठ्याना तरी किमान प्रदूषित होण्यापासून वाचवावे अशी मागणी भाजपाचे अश्विन मोगरकर यांनी केली आहे.

----------------------------------------

मारल्याने सर्वत्र शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. पुढील चार दिवस हे मराठवाड्याच्या वेगवेगळ्या जिल्ह्यांत पावसाचे असल्याचा हा अंदाज आहे. हा होणारा पाऊस सरासरी एवढाच असल्याचे सांगितले गेले आहे. अधिकच्या व दमदार पावसाची प्रतीक्षा असताना पुढील चार दिवसांत केवळ हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी बरसणार असल्याचा अंदाज सांगण्यात आला आहे.

--------------------------------------

## पान 4 वरुन

दिले. स्थानिक गन्हे शाखेचे प्रमुख पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी लागलीचा पथके नेमुन बीड, आहिल्यानगर, छ.संभाजीनगर येथे रवाना केली. पोउपनि महेश विघ्ने यांना गोपनिय माहीती प्राप्त झाली की सदरचा गुन्हा हा आरोपी नामे 1.सुमीत सुभाष रुपेकर वय 19 वर्ष रा.सजापुर वाळुज ता.जि. छ.संभाजीनगर 2.अजय संजय पंडीत वय 20 वर्षे रा.निपाणी वडगाव ता.श्रिरामपुर जि.अहिल्यानगर यांनी मिळुन केला आहे.व सदरचे दोन्ही आरोपी हे श्रीरामपुर येथे अशोकनगर भागात आहेत.यावरुन सदर श्रीरामपुर येथे जावुन दोन्ही ईसमांना ताब्यात घेतले.सदरचे दोन्ही आरोपीतांनी केले असल्याची कबुली दिली.सदर गुन्हयात गुन्हा करतवेळी वापरण्यात आलेली आरोपी क्रं.01 याची मोटार सायकल जप्त करण्यात आली आहे.सदर आरोपीतांना पुढील कारवाई कामी पोलीस स्टेशन शिवाजीनगर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.ऊर्वरीत मुद्येमालाचा शोध स्था.गु.शा.बीड व पो.स्टे.शिवाजीनगर करत आहेत.सदरची कामगिरी मा.श्री नवनीत कॉवत साहेब,पोलीस अधिक्षक सोहब बीड, मा.श्री सचीन पांडकर अप्पर पोलीस अधिक्षक बीड पोनि श्री शिवाजी बंटेवाड,स्थागुशा,बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने, राहुल शिंदे, महेश जोगदंड, राजु पठाण, बप्पासाहेब घोडके, गणेश मराडे यांनी केली आहे.

----------------------------------

अबॅकस लेवल पात्रता परीक्षा सर्वोत्कृष्ट क्रमांकाने मयंक चौधरीने सुद्धा यश मिळवले आहे. अबॅकस लेव्हल परीक्षेमध्ये जाहीर झालेल्या निकालाप्रमाणे मयंक चौधरीने सर्वोत्कृष्ट मानद उडन सायटेशन , मेडल मिळालेलं आहे. जागतिक अबॅकस स्पर्धेमध्ये भारतासह, नेपाळ, श्रीलंका, यु एस ए , रशिया, जर्मनीमधील बर्लिन, चायना हाँगकाँग, मलेशिया देशातील विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. मयंक चौधरीने फक्त दहा मिनिटांमध्ये अगदी बरोबर गणिते सोडवून पैकीच्या पैकी मार्क्स मिळवून ऐतिहासिक विक्रम केलेला आहे. गेल्या चार ते पाच महिन्यापासून सतत प्रयत्न करत असल्यामुळे त्यांच्या पालकांनी, शिक्षकांनी सतत योग्य ते मार्गदर्शन करून त्याला यश प्राप्त करण्यास सहकार्य केले आहे. अबॅकस तथा वैदिक गणित मार्गदर्शक डॉ. एस. ए. घोडके यांनी त्यांना सतत गणितामधील असलेल्या अडचणी दूर करण्यास प्रयत्न केलेले आहे. समाजातील सर्व स्तरांमधून मयंक चौधरीचे अभिनंदन होत असून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत. अबॅकसमुळे मनातील गणित विषयाच्या आकडेमोड विश्वास मिळून , गणिताबद्दलची मनात असलेली भीती नष्ट होऊन अनेक क्लिष्ट अशा गणितीय पद्धती सोप्या पद्धतीने विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, स्मरणशक्ती यांचा विकास करण्यासाठी अबॅकसचा उपयोग केला जातो असे जिल्हा अबॅकस वितरक घोडके एस. ए. यांनी सांगितले आहे.

--------------------------------------

सर्क्युलर पण आहे व सीओचे ही पत्र आहे. ग्रामसेवकांनी जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार काम करणे अपेक्षीत आहे. काही ग्रामसेवक प्रमाणपत्र देतात किंवा साधे सही शिक्के कोणीतरी देत असावेत अशी शक्यता आहे. परळीतील नागापूर येथील ग्रामसेवक शाम गंगाधरे यानी तेथील कामगारांना नुतणीकरणासाठी प्रमाणपत्र दिले नाही म्हणून तेथील कामगार सीटू बांधकाम कामगार संघटनेच्या नेतृत्वात दि. 30 रोजी पासून धरणे आंदोलन करणार आहेत. व शहरालगत बांधकाम कामगार पंचायत समितीपुढे निदर्शने करणार आहेत. तालुक्यातील बांधकाम कामगारांनी मोठ्या संख्येने धरणे आंदोलकांना पाठिंबाव देउन निदर्शने करणासाठी 30 जून रोजी सकाळी 11 वाजता हजर रहावे असे आवाहन प्रा.खाडे बी.जी. यांनी केले आहे.

-------------------------------------

असे प्रतिपादन कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉक्टर कृष्णाजी कर्डिले यानी केले कार्यक्रमाचे अध्यक्ष कृषी विज्ञान केंद्राचे प्रमूख डॉक्टर वसंतराव देशमूख हे होते कार्यक्रमाचे प्रस्ताविक परिवर्तन संस्थेचे प्रकल्प सन्मयक नागनाथ चव्हाण यांनी केले प्रमूख उपस्थितित राहूलजी गंडले , गणेश टेकाळे , शांताबाई कांळूके , महादेव पोटभरे , भाग्यश्री पोटभरे (पिंप्री )संतराम सुरवसे, धम्मा चव्हाण, नारायण घाटे , अशोक सूरवसे (तळेगांव घाट) हरिभाऊ बनसोडे , नारायण वाघमारे (लिबगांव)सुरेखा इंगळे, विष्णु सरवदे, सिंधुबाई इंगळे, यादव मस्के, आन्नासाहेब इंगळे, सुधाकर जोगदंड, महादेव इंगळे, अतुल भगत, (वाघाला),शिंदूबाई वाघमारे, भारत ओव्हाळ , रावण वाघमारे, नामदेव वाघमारे, (पोखरी)प्रमोद दासुद, अरुण मस्के,केशव ओग़ले, (हातोला)भागीरथ कोरडे ,श्रीहरी गंडले,(बर्दापुर)प्रभाकर आदमाने, शेषेराव काशिकर, (जवलगांव)सर्व शेतकऱ्यांना सोयाबीन बी मोफ़त वाटप करण्यात आले .

--------------------------------------

सपशेल दुर्लक्ष करत आहेत. हजारो लिटर पाणी गेल्या दोन महिन्यापासून वाया जात असून परळीकरांना ते जर उपलब्ध झाले तर पुरेशा प्रमाणात त्यांना पाणी मिळेल मात्र याचे नगरपालिका प्रशासनास काही देणे घेणे नाही. परळी शहरातील विकास कामांमध्ये मोठा भ्रष्टाचार नगरपालिकेकडून झाला आहे. या संदर्भात माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागवणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. सर्व कामे बोगसपणे परळी शहरात चालू आहेत याकडेही मुख्याधिकारी साहेबांचे लक्ष नाही. नगरपालिकेच्या कामकाजामुळे अगोदरच नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यात पाणी संकट निर्माण झाले आहे. राखेच्या तलावाजवळ अक्षरशः हजारो लिटर पाणी वाया जाऊन खड्डे साचले आहेत. पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे ही नगरपालिकेचे कर्तव्य आहे परंतु त्यांना नागरिकांच्या समस्येविषयी काही देणे घेणे राहिले नाही. दोन महिन्यापासून पाईपलाईन फुटल्याने तेथे हजारो लिटर पाणी वाया जात आहे मात्र एकही कर्मचारी साधा फिरकला सुद्धा नाही. दोन दिवसात पाईपलाईन दुरुस्त न केल्यास ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे सरांच्या नेतृत्वाखाली भव्य आंदोलन नगरपालिकेवर दिले जाईल याची सर्व जबाबदारी नगरपालिका प्रशासनाचे असेल असा इशारा त्यांनी दिला आहे.

--------------------------------------

सोहळ्यामध्ये सहभागी होतात. यामध्ये प्रामुख्याने अंभोरे येथील भोसले महाराजांची दिंडी, गुंजमुर्ती संस्थान, शेषाबाई संस्थान तांबवा, रामगड संस्थान, विठ्ठलगड संस्थान, रामेश्वर संस्थान, भगवानबाबा संस्थान सुपेसावरगांव, महालक्ष्मी संस्थान भोगलवाडी, राजा हरिश्चंद्र संस्थान, जवळा ग्रामस्थ, संत भगवानबाबा संस्थान बोरकिन्ही, भाग्येश्वर संस्थान तरडगव्हण, गणपतबाबा संस्थान सावरगाव, कुमंडलेश्वर संस्थान घोगस पारगांव, सिद्धेश्वर संस्थान शिरुर कासार, मायंबा संस्थान भालगांव, भगवानबाबा संस्थान छत्रपती संभाजीनगर - पैठण - आळंदी, संत भगवानबाबा संस्थान वडवणी, कानिफनाथ संस्थान खडकवाडी, केशवराज संस्थान वारणी, कानिफनाथ संस्थान खर्डा, हनुमान टाकळी संस्थान, शहर टाकळी संस्थान, कानिफनाथ संस्थान खोकरमोह, सालसिद्धेश्वर संस्थान मिडसांगवी, संत भगवानबाबा संस्थान तागडगांव इत्यादी संस्थानांचा समावेश होतो. ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली निघालेल्या या भव्यदिव्य पालखी सोहळ्याच्या प्रस्थानावेळी भगवानगड परिसरातील हजारो भाविकांची उपस्थिती होती.

------------------------------------

व कर्तव्याची जाणीव ठेवायला सांगितली व नवनिर्वाचित विद्यार्थी परिषदेतील विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन त्यांच्या शिस्तीचे व नेतृत्वाचे कौतुकही केले.याप्रसंगी प्रमुख अतिथी व शाळेचे प्राचार्य यांच्या हस्ते विद्यार्थी परिषदेतील विविध समित्यांचे विद्यार्थी प्रतिनिधी प्रमुख यांचा बॅचेस देऊन गौरव करण्यात आला. तसेच शालेय प्रशासन सुरळीत चालावे यासाठी नवनिर्वाचित विद्यार्थी परिषदेतील सर्वच विद्यार्थ्यांचा शपथविधी व पदग्रहण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. त्यानंतर मागील शैक्षणिक वर्षातील बेस्ट हाऊस म्हणून यलो हाऊसचा गौरवही करण्यात आला.सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख तसेच कलाशिक्षक श्री. प्रसाद देशपांडे, क्रीडा विभागातील कु.संघमित्रा मॅडम, श्री.भरत सर, श्री.आकाश सर व सर्वच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि. यशराज बोंबलगे, कु. वैष्णवी जाधव, कु. अभिलाषा दहिवाळ, कु. तन्वी फड यांनी तर आभार प्रदर्शन चि. कपिल सावंत याने केले.सदरील कार्यक्रमास स्वामी विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.उषा किरण गित्ते मॅडम ,शाळेचे मार्गदर्शक व प्रेरणास्त्रोत मा.श्री.किरण गित्ते साहेब (सचिव,त्रिपुरा सरकार) , शाळेचे प्राचार्य मा.श्री.श्रीकांत पाटील सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

--------------------------------------

केल्या आसुन यामध्ये सर्वाधिक सोयाबीन पेरणीवर मोठ्या प्रमाणात भर देण्यात आले. परंतु पावसाने सतत गेल्या आठ ते दहा दिवसा पासुन कायमची उघडीप दिल्याने त्यात तळपत्या ऊन्हाची तिव्रता यातुन जमिनीत निर्माण झालेला उखाडा यामुळे एकदरीत वातावरण पहाता मोठ्या प्रमाणात पेरलेली बियाणे जमिनीतच कोमेजुन गेली. तर काही उगवलेली पिके करपु लागली असुन वरुण राजाच्या अवकृपेमुळे आता शेतकऱ्यां समोर दुबारा पेरणीचे संकट उभारले आसुन आशा चिंतातुर हवालदिल शेतकऱ्यांना दुबारा पेरणीसाठी शासनाने अर्थिक मदत करण्याची मागणी शेतकरी वर्गातुन होत आहे. तर यंदाच्या खरीप हंगाम पेरणीच्या सुरवातीलाच नैसर्गिक वातावरणातील सततच्या बदलाचे चित्र सध्यातरी तालुक्यासह जिल्हाभरात दिसुन येत आसुन हवामान तज्ञानी दिलेले पावसाचे अंदाज देखील या बदलत्या नैसर्गिक वातावरणामुळे फोल ठरत आसल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

----------------------------------------

सुरुवात डॉ.राजेश इंगोले व इतर मान्यवरांच्या हस्ते उदघाटन फित कापून आणि महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करुन करण्यात आली. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी शिक्षण हे केवळ पुस्तकातून वाक्य बोलून शिकविल्याने आत्मसात होत नाही तर त्याला अनुभव समृद्धीची जोड दिल्यास शिक्षण हे खऱ्या अर्थाने आपल्या जीवनामध्ये वापरता येऊ शकते. आणि असे शिक्षण घेतलेली पिढी खऱ्या अर्थाने संशोधक किंवा नवनिर्माते होऊ शकतात. नेटीझन्स प्री-प्रायमरी स्कूल मध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून लहान मुलांच्या बुद्धिमत्तेला विकसित करण्यासाठी पुस्तकी ज्ञानाबरोबरच त्या ज्ञानाला आवश्यक असे अनुभव समृद्ध शिक्षण देण्याचा अभिनव प्रयत्न प्राचार्य.डॉ मिलिंद ढगे प्रथमच अंबानगरीमध्ये करीत आहेत. हा वेगळा मार्ग चोखाळलेले ढगे हे निश्चितच शिक्षण क्षेत्रात या आपल्या आगळ्यावेगळ्या मार्गाने एक नवीन संशोधक पिढी घडवतील असा विश्वास आहे.या शाळेमधील शिक्षण घेतलेले विद्यार्थी निश्चितपणे आत्मसात केलेल्या ज्ञानाचा उपयोग समाज हितासाठी नवीन संशोधन, नवीन संकल्पना निर्मिती करुन करतील यात शंका नाही. बाल वय हे आजूबाजूचे निरीक्षण करून ज्ञान आत्मसात करत असते. या वयात जर विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या मनोरंजनात्मक प्रयोगांमधून ज्ञान देण्याचा प्रयत्न केला. तर त्यांची बुद्धिमत्ता विविध अंगांनी वाढण्याचा संभव वाढतो. त्यांची निरीक्षण क्षमता, निर्णय क्षमता आपोआप वाढते. मेंदूला प्रयोगांती मिळालेले निष्कर्ष मुलांच्या मेंदूत दीर्घकाळ लक्षात राहतो. यातून विद्यार्थ्यांच्या संशोधक बुद्धीला वाव मिळतो. एकाच गोष्टीवर विविध पद्धतीने विचार करण्याची मेंदूची क्षमता वाढते. हे अनुभव समृद्ध शिक्षण विद्यार्थ्याला अष्टपैलू बनवते त्यामुळे नेटीझन्स प्री-प्रायमरी नॅशनल स्कूल निश्चितपणे शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र क्रांती घडवून आणेल यात शंका नाही असे गौरवोद्गार डॉ. राजेश इंगोले यांनी उद्घाटनपर मनोगत केले. यावेळी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी शाळेमध्ये शिक्षक - विद्यार्थ्यांचे नाते घरी पालक आणि पाल्याचे नाते कसे असावे यावर प्रकाशझोत टाकत शिक्षक आणि पालकांना आपल्या जबाबदारीची जाणीव करुन दिली. शिक्षण घेत असताना शाळेत तसेच घरी सकारात्मक वातावरण कसे निर्माण करायचे, बालसंस्कार पालकांनी शिक्षकांनी आपल्या कृतीतून कसे द्यावे यावर मौलिक मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य योगेश सुरवसे यांनी बोलताना नेटीझंस प्री-प्रायमरी स्कूलने हा अभिनव प्रयोगशील उपक्रम केला याबद्दल त्यांचे कौतुक केले. हा प्रयोग करत असताना समाजातील वंचित, गरजू घटकांना या शिक्षण प्रवाहात सामावून घेण्याचे आवाहन करीत शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना उपप्राचार्य विभीषण फड यांनी प्रा.मिलिंद ढगे हे एक अजब रसायन आहे. विविध शैक्षणिक प्रयोग करणे, सामाजिक प्रयोग करणे हा त्यांचा छंद आहे आणि त्यांनी केलेल्या विविध प्रयोगांमध्ये त्यांना निश्चितपणे आतापर्यंत यश आलेले आहे. नेटिजन्स प्री-प्रायमरी स्कूल ही अशाच उपक्रमशील प्रयोगांची शाळा व्हावी आणि भविष्यामध्ये हा प्रयोग निश्चितपणे यशस्वी होणार आहे असे सूतोवाच केले. प्रास्ताविक करताना प्रा.मिलिंद ढगे यांनी नेटिझन्स प्री प्रायमरी नॅशनल स्कूल ही अनुभव समृद्ध शिक्षणाची प्रयोगशाळा होणार आहे. इथे शिकणारा प्रत्येक विद्यार्थी ज्ञानाच्या अनुभवासोबतच प्रयोगाचे अनुभव ही घेणार आहे. मेंदू हा वेगवेगळ्या प्रकारच्या पंचेंद्रिया द्वारे अनुभव घेत, त्या परिस्थितीची स्मृती निर्माण करून या स्मृतीचा भविष्यात आपल्या जीवनात उपयोग करत असतो.जपानमध्ये मुलांची बुद्धिमत्ता विकसित करण्यासाठी याच प्रकारच्या तत्वाचा उपयोग केला जातो. हेच हेरुन या नेटिझन्स प्रीप्रायमरी नॅशनल स्कुलमध्ये स्मार्ट स्क्रीन, स्मार्ट वैज्ञानिक खेळणी, स्मार्ट खेळ आणि सोप्या भाषेत अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे. त्यामुळे इथं शिकणारा प्रत्येक विद्यार्थी हा निश्चितपणे स्मार्ट विद्यार्थी बनणार आहे असे आश्वासन उपस्थित पालकांना दिले. हे शिक्षण केवळ पुस्तकी ज्ञान असणार नाही. तर त्याला विविध उपक्रम आणि प्रयोगाची जोड दिल्याने ते शिक्षण या विद्यार्थ्यांना आपल्या जीवनामध्ये कायमस्वरूपी स्मरणात राहणार आहे आणि या अनुभवानी ते भविष्यामध्ये विविध प्रयोग करून ते काम करत असलेल्या प्रत्येक क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल घडून आणतील असा विश्वास मिलिंद ढगे यांनी यावेळी व्यक्त केला. अध्यक्षीय समारोप करताना पांडुरंग ढगे यांनी विद्यार्थी घडविण्याचे काम शिक्षक करतो. शिक्षणाचा उद्देश ज्ञान प्राप्ती करणे आणि त्या ज्ञानाचा समाजाच्या उन्नतीसाठी उपयोग करणे हा असतो असे सांगितले. यावेळी माजी मुख्याध्यापक लंकेश वैद्य, इंगळे सर यांनीही समयोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मीरा होके यांनी केले. तर उपस्थितांचे आभार माधव घाडगे यांनी मानले. कार्यक्रमासाठी परिसरातील नागरिक, पालक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका श्रीमती कुलकर्णी, संचालिका श्रद्धा ढगे, रत्नदीप गोरे, डॉ. किरण चक्रे यांच्यासह शाळेच्या शिक्षक आणि कर्मचारीवृंद यांनी परिश्रम घेतले.

-------------------------------------------

उल्हास गिराम यांनी सांगितले.गटाराच्या एकदम मधोमध हातपम्प असल्यामुळे एक बाजु पूर्णपणे कोंदली आहे. सुरळीत गटाराचे पाणी पुढे प्रवाहित होत नाही. गटार साफ करतांना संबंधित सफाई कामगार, संबंधित स्वच्छता निरीक्षक यांच्या लक्षात आले नसेल का? पालिका प्रशासनाने या कामाची गुणवत्ता तपासली नसेल का? बिले निघण्या आगोदर संबंधित कामाची नियमावली, निकष, कार्य पद्धत, गुणवत्ता या सर्वांची पायमल्ली झाली असल्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.

--------------------------------------

राजेश कौलवार व नागनाथ पारसेवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून आपले विचार मांडले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. कदरकर सर, पर्यवेक्षक श्री. धायगुडे सर प्रतिष्ठान चे अध्यक्ष नागनाथ पारसेवार, राजेश कौलवार, अभय ठक्कर,विनोद कौलवार ,श्रीनील रुद्रवार, प्रकाश चिद्रवार,अनिल मालेवार, नंदू देवशेटवार बाळू वांकर, मनोज गावडे, विवेक पारसेवार तसेच शाळेचे माजी मुख्याध्यापक कोम्मावार सर उपस्थित होते.

अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक श्री. कदरकर सर यांनी केला. तर कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका सौ.सुनीता कोमावार मॅडम यांनी केले. व कार्यक्रमाचे आभार शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री नितीन व्हावळे सर यांनी मानले.

-------------------------------------

असणे गरजेचे आहे मुख्याध्यापक यांनी विद्यार्थी वाढविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे हे सगळे करण्यासाठी गावकऱ्यांनी शाळेला सहकार्य करणे गरजेचे आहे गुणवत्ता व दर्जेदार शिक्षण देणे शिक्षकांचे काम आहे पण या शाळेतील विद्यार्थी विद्यार्थ्याचेच डोके दगडाने फोडतो हे या शाळेला न शोभणारी बाब आहे तरी वरीष्ठ पातळीवर दखल घेऊन असे प्रकार थांबविने शिक्षकांचे काम असल्याने त्यांना समज देणे गरजेचे आहे तरि गावकऱ्यांनी बंद होणाऱ्या शाळेला विद्यार्थ्यांची संजिवणी देणे गरजेचे आहे

--------------------------------------

करावी व या समाजकंटकाच्या मागे कोणाचा हात आहे, याचा शोध घेऊन त्यास कठोर शासन करण्याची मागणी राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ केज शाखेच्या वतीने केज तहसिलदार कार्यालयात निवेदणाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी संघाचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष अनिल वैरागे, संघाचे केज तालुका अध्यक्ष दिनकर जाधव, ता.सचिव मनोराम पवार, मा.तालुकाध्यक्ष रंजित घाडगे, सचिन भालेराव, सचिन लांडगे, कल्याण मस्के, पत्रकार तात्या गवळी यांची उपस्थिती होती.

--------------------------------------

रुई हे गाव पुनर्वशीत गाव आहे या गावच्या जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या ही 65 इतकी आहे शाळेत चौथीपर्यंतच वर्ग आहेत पटसंख्या संख्या कमी असल्याने शिक्षकांबरोबर गावचे सरपंच ही पटसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करतात.शाळेची गुणवत्ता देखील चांगली आहे एकीकडे जिल्हा परिषद शाळेची पट संख्या वाढवण्यासाठी व टिकवण्यासाठी शासनाला ही अनेक प्रयत्न करावे लागत आहेत.शालेय साहीत्य गणवेश, बुट,पुस्तक व मध्यान भोजन देऊन विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबवल्या जातात.शासनाकडून ही विद्यार्थ्यांना पहिल्या दिवशी पुस्तकाचे वाटप केले जाते याच पार्श्वभूमीवर रुई गावचे सरपंच मयूर आंधळे यांनी देखील शाळेतून मिळणाऱ्या मोफत पुस्तके ठेवण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व इतर शालेय साहित्य देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले आहे.यावेळी उपस्थित होतेगेल्या दोन वर्षापासून रुई गावच्या शाळेमध्ये दर महिन्याला वेगवेगळे उपक्रम राबविले जातात.तसेच विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी शाळेला पाच लाख रुपयांचे ग्राउंड ही मंजूर करून घेतले आहे.लवकरच शाळेत स्वखर्चाने सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत.विद्यार्थ्यांसाठी शाळेत वेगवेगळे उपक्रम राबवत आहोत.गावात दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी आम्ही सर्व प्रयत्न करत आहोत.



# बीड स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

## बीड शहरात एकाच दिवशी दोन ठिकाणी चेन स्नॉचींग करणारे दोन आरोपी स्था.गु.शा. कडून जेरबंद



बीड प्रतिनिधी दि.08/06/2025 रोजी फिर्यादी नामे ज्योति विजय उदावंत रा.उमरखेड ता.महागाव जि.यवतमाळ यांनी पोलीस स्टेशन शिवाजी नगर येथे फिर्याद दिली होती की,दि.07/06/2025 रोजी फिर्यादी हया त्यांचे मुली सोबत नातवाचा साखरपुडा बीड येथे असल्याने त्यांचे भाऊ यांचे घरी आल्या होत्या.दि.08/06/2025 रोजी फिर्यादी व त्यांची मुलगी हया साखरपुडयाचे सामान खरेदी करण्यासाठी राजीव गांधी चौक येथे आल्या होत्या.दुपारी 03.00 वा दरम्याण फिर्यादी या ऍटो मध्ये बसत असताना फिर्यादी यांचे पाठी मागुन दोन अज्ञात ईसम मोटारसायकल वर बसुन आले व फिर्यादी यांचे गळयातील 20 ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण किं.90,000/- रु हे हिसकावुन घेवुन गेले.अश्या वर्णनाच्या फिर्यादीवरुन गुन्हा नोंद झाला होता.तसेच पोलीस स्टेशन बीड शहर येथे दि.08/06/2025 रोजी फिर्यादी नामे शिल्पा अमोल वाव्हळ रा.फुलाईनगर ता.जि.बीड यांनी फिर्याद दिल होती की,फिर्यादी हया त्यांचे मुली सोबत खरेदी कामी डी.पी.रोड बीड येथे गेल्सा होत्या.फिर्यादी या त्यांची स्कुटी गाडी स्टॅन्डवर लावत असताना फिर्यादी यांचे जवळ तोंडाला बांधुन मोटार सायकलवर बसुन दोन ईसम आले .यातील समोरील ईसमाने डोक्यावर हेल्मेट घातलेले व अंगात पांढऱ्या रंगाचे शर्ट व काळी पॅन्ट व पायात पांढऱ्या रंगाचे बुट घातलेले दिसुन आले.व मागील ईसम हा काळया रंगाचे जरकीन घातलेला व डोक्यावर पिस्ता रंगाची टोपी घातलेला होती.यातील मागे बसलेल्या ईसमाने फिर्यादी यांचे गळयातील मिनी गंठण वजनी 13 ग्रॅम मागे बसलेल्या ईसमाने ओढुन घेवुन गेले यावरुन पो.स्टे. बीड शहर गु.र.नं 100/2025 कलम 304(2),(5) बी.एन.एस प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

या दाखल गुन्हयांची माहिती पोलीस अधिक्षक नवनीत काँवत साहेब यांना मिळताचा त्यांनी सदरील गुन्हयातील आरोपींना अटक करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला पान 3 वर

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केला चि.मयंक चौधरीचा सत्कार



बीड / प्रतिनिधी दि. 24 जून 2025 रोजी अबॅकसच्या सर्व स्पर्धेमध्ये मयंक चौधरीने सर्वोत्कृष्ट मानांकन, सर्वोत्कृष्ट स्पर्धक, सर्वोत्कृष्ट विजेता असे अनेक पदक आणि ट्रॉफी मेडल मिळवलेले असल्यामुळे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी मयंक चौधरीचा जिल्हाधिकारी कार्यालय बीड या ठिकाणी सत्कार करून शुभेच्छा देवून पाठीवर हात ठेवून असाच अभ्यास करत रहा अशी शाबासकी दिली.

शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होतो. शहरातील अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस आणि चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. एजीसीएलएल लंडन वर्ल्ड एजन्सी आणि इंटरनॅशनल स्तरावरील ऑनलाइन अबॅकस चॅम्पियनशिप तसेच अबॅकस ऑनलाईन लेव्हल प्रमाणे परीक्षा, आंतरराष्ट्रीय अबॅकस असोसिएशन यांच्या सहकार्याने जागतिक स्तरावरील अबॅकस स्पर्धा पात्रता मिळवण्यासाठी पान 3 वर

# 30 जून रोजी परळी पंचायत समितीसमोर बांधकाम कामगारांचे बेमुदत धरणे आंदोलन -प्रा खाडे बी. जी.



परळी वैः - परळी तालुक्यातील बांधकाम कामगारांना बांधकाम कामगार कल्यानकारी मंडळाकडे नोंदणी व नुतणीकरणासाठी ग्रामसेवकांनी मागील वर्षी 90 दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र द्यावे या मागणीसाठी परळी तालुक्यातील बांधकाम कामगार 30 जूनपासून सीटू संघटनेचे प्रा खाडे यांच्या नेतृत्वात धरणे आंदोलन करणार आहेत.

इंदपवाडी, गाडे पिंपळगाव, कन्हेरवाडी धर्मापूरी, सेलू जिरेवाडी, हाळम, हेळंब, मांडवा, नागापूर, करेवाडी बोधेगांव ,मोहा, वाका, पाडोळी, हासनाबाद, वानटाकळी या गावातील ग्रामसेवकांनी बांधकाम कामगारांना नोंदणीसाठी प्रमाणपत्र दिल्याची सुविधा केंद्रात नोंद आहे. सर्व ग्रामसेवक महाराष्ट्र सरकारचे नोकर असताना त्यांचे वेगवेगळे नियम कसे आहेत. नागापूरचा ग्रामसेवक एका कामगाराला प्रमाणपत्र देतो व बाकी कामगारांना का देत नाही याची चौकशी झाली पाहिजे. बांधकाम कामगारासाठी मंडळाने काढलेल्या बांधकाम कामगारांच्या स्वरुपा मध्ये बांधकाम मिस्त्री, वेल्डर पेंटर, प्लंबर वीटभट्टी कामगार, सुतार, AC कामगार, Lift मन, फरशी कापणार, काचेचे काम करणारा कामगार हा बांधकाम कामगार आहे.त्यांना नोंदणीसाठी ग्रामीण भागात ग्रामसेवकाने प्रमाणपत्र दिले पहिजे. रोज वेगवेगळ्या मालकाकडे काम करणाऱ्या बांधकाम कामगारास ग्रामसेवकाने प्रमाणपत्र द्यावे असे पान 3 वर

# परिवर्तन संस्था सुमठाना व कृषी विज्ञान केंद्रा मार्फत सोयाबीन बियाणे वाटप



प्रतिनिधि.ईनामदार बर्दापूर

कृषी विज्ञान केंद्र डिघोळ अंबा व परिवर्तन संस्था सुमठाना यांच्या सयुक्त विद्यामानाने शेतकऱ्यांना प्रशिक्षण व सोयाबीन बियाने वाटप करण्यात आले .

देशात 145 कोटी लोकसंख्या असून त्यांच्या उपजिवेकेसाठी अन्न धान्य उद्पादन वाढविणे हा केंद्र सरकारचा मूळ उद्देश असल्याने कृषी विज्ञान केंद्रा मार्फत नवनवीन संसोधीत बियाने व तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना मिळावी हा उद्देश उद्देश असून बदलत्या हवामाना सुमार पिक लागवडीची पद्धत बदलून उद्पादन वाढवावे पान 3 वर

# दोन दिवसात पाईपलाईन दुरुस्त करा अन्यथा आंदोलन - प्रदीप मुंडे

## राखेच्या तळ्याजवळ परळी नगरपालिकेची पाईपलाईन फुटली; हजारो लिटर पाणी वाया तरीही मुख्याधिकारी साहेबांचे दुर्लक्ष!



परळी वैजनाथ प्रतिनिधी परळी तालुक्यातील डाबी टोकवाडी रस्त्यादरम्यान असलेल्या राखेच्या तळ्याजवळ परळी नगरपालिकेची पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन फुटल्याने अक्षरशः हजारो लिटर पाणी वाया जात आहे मात्र नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना पाहिला आणि दुरुस्त करायला वेळ नाही ही लाजिरवाणी गोष्ट आहे. दोन दिवसाच्या आत पाईपलाईन दुरुस्त न झाल्यास ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे सरांच्या नेतृत्वाखाली नगरपालिकेवर भव्य आंदोलन केले जाईल असा इशारा नागापूर जिल्हा परिषदेचे सदस्य प्रदीप भैय्या (बबलू शेठ ) मुंडे यांनी मुख्याधिकारी साहेबांना दिला आहे. या संदर्भात त्यांनी नगरपालिकेच्या पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनची पाहणी केली.

पावसाने दडी मारल्याने परळीकरांना पिण्याचे पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाही. आठ दिवसांमध्ये एकदा पाणी नगरपालिकेच्या पाईपलाईनने पुरवठा केला जातो. नागरिक पाण्यासाठी त्रस्त आहेत मात्र निगरगठ्ठ मुख्याधिकारी साहेब याकडे पान 3 वर

# विठ्ठल नामाच्या जयघोषात श्री क्षेत्र भगवानगडाच्या पालखीचे प्रस्थान



बीड / प्रतिनिधी महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र भगवानगडाच्या पालखीचे मंगळवार दि.24 जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान झाले. श्री क्षेत्र भगवानगडाचे संस्थापक, ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबा यांनी नारायणगडावर असतानाच मराठवाड्यातून पहिला पायी पालखी सोहळा प्रारंभ केला होता. हीच परंपरा भगवानगडाच्या स्थापनेपासून ते आजतागायत सुरु आहे. श्री क्षेत्र भगवानगडावरुन निघणाऱ्या या पायी पालखी सोहळ्याचे प्रस्थान मंगळवारी दुपारी ठीक 4 वाजता झाले.

पालखीचे मुक्काम अनुक्रमे भारजवाडी, बावी, खोकरमोह, करंजवन, डिघोळ, जयवंतनगर, कुंबेफळ, पिंपरी, कुर्डुवाडी, ढेकळेवाडी या ठिकाणी होऊन अकराव्या मुक्कामाला पालखी पंढरपूरमध्ये पोहोचते. दरम्यान प्रस्थानापासून ते पंढरपूरमध्ये पोहोचेपर्यंत अनेक दिंड्या भगवानगडाच्या पायी पालखी पान 3 वर

# दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थी परिषदेचा पदग्रहण समारंभ व शपथविधी उत्साहात संपन्न



परळी(प्रतिनिधी): गुणवत्ता पूर्ण शिक्षणामध्ये अग्रगण्य असणाऱ्या दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल येथे विद्यार्थी परिषदेचा पदग्रहण समारंभ व शपथविधी मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी सौ.चेतना तिडके मॅडम (अप्पर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई) यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. तसेच याप्रसंगी शाळेचे प्राचार्य मा. श्री. श्रीकांत पाटील व सन्माननीय पालकही उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेतील विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले व प्रमुख अतिथींचा यथोचित सन्मानही करण्यात आला.

सदरील कार्यक्रमास मतदानातून निवड झालेल्या विद्यार्थी परिषदेतील विद्यार्थी प्रतिनिधींनी हेड बॉय चि. सुदर्शन गित्ते व हेड गर्ल कु. नंदिनी चाटे यांच्या नेतृत्वात परेडचे उत्तम सादरीकरण केले. यावेळी प्राचार्य मा. श्री.श्रीकांत पाटील यांनी आपल्या प्रस्ताविकातून विद्यार्थ्यांना शिस्त व उत्तम नेतृत्व कौशल्याचे महत्त्व सांगितले. तसेच प्रमुख अतिथी अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम यांनी आपल्या मनोगतातून जबाबदारी पान 3 वर

# शेतकऱ्यावर डबल पेरणीचे संकट पावसाने शेतकऱ्यांच्या शेतीकडे फिरवली पाठ.

महेंद्र गोदाम ग्रामीण प्रतिनिधी घाटनांदुर



अंबाजोगाई, घाटनांदुर मृग नक्षत्रात पावसाने मोठी हजेरी लावल्याने अंबाजोगाई तालुक्यातील जवळपास 80 ते 90 टक्के शेतकऱ्यांनी खरीप पेरण्या पुर्ण केल्या आसुन गेल्या आठवडा भरापासुन पावसाने पाठ फिरवल्याने उगवलेली पिके करपली तर काही उगवलीच नसल्याने शेतकऱ्यां समोर दुबारा पेरणीचे संकट उभे राहील्याचे चित्र सर्वत्र दिसुन येत आहे.

पेरणी पुर्व मशागतीची कामे वेळीच पुर्ण करुन अनेक शेतकऱ्यांनी खरीप पेरणीसाठी बी-बियाने रासायनिक खते खरेदीसाठी कर्ज बाजारीतुन पैश्याची जुळवा जुळव करुन बाजारात मनमानी महागड्या दराने विक्री करणाऱ्या कृषी दुकानदाराकडुन ती खरेदी केली. मोठ्या पावसाच्या प्रतिक्षेत आसलेल्या शेतकऱ्यांनी मृग नक्षत्राच्या सुरवातीलाच पावसाने लावलेली जोरदार हजेरी त्यात हवामान खात्याच्या तज्ञानी पावसाचा सांगितलेला अंदाज पहाता तालुक्यातील बहुतांशी जवळपास 80 ते 90 टक्के शेतकऱ्यांनी दि.10 ते 12 जुन दरम्यान खरीपाच्या पेरण्या पुर्ण पान 3 वर

# 'स्मार्ट' शिक्षणातून घडतील गुणवंत विद्यार्थी - सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. राजेश इंगोले

## अंबाजोगाईत नेटीझन्स प्री-प्रायमरी नॅशनल स्कूलचे उद्घाटन



परळी / प्रतिनिधी

महात्मा फुले स्मारक समिती, माळी नगर, अंबाजोगाई येथे नुकतेच नेटीझंस प्री.प्रायमरी स्कूलचे उद्घाटन अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विचारमंचावर डायटचे प्राचार्य योगेश सुरवसे, खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विभीषण फड, माजी मुख्याध्यापक लंकेश वैद्य, पांडुरंग ढगे, इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची पान 3 वर

# चक्क हातपम्प घातला गटार कामात!

## संबंधित गुत्तेदार व त्यांची बिले काढणाऱ्या अधिकाऱ्यांचा सत्कार करणार - उल्हास गिराम



बीड / प्रतिनिधी बीड नगरपालिकेचा गलथान कारभार. मागील चार वर्षांपासून नगरपालिके वर प्रशासक आहे. या काळात पालिका प्रशासनाने मनसोक्त हात साफ करुन घेतला. राजीव गांधी चौकातुन शासकीय आयटीआयच्या मागील रस्त्यावर नव्याने रस्ता व नाली काम झाले. या मार्गावर असलेला हातपम्प (हापसा) बाजूला काढणे अपेक्षित होते. परंतु याचे गांभीर्य ना नगर पालिकेला ना संबंधित गुत्तेदाराला. चक्क हातपम्प गटार कामात घातला. संबंधित गुत्तेदार व त्यांची बिले काढणाऱ्या अधिकाऱ्यांचा सत्कार करणार असल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख पान 3 वर

# स्व. वंदना नागनाथ पारसेवार प्रतिष्ठानच्या वतीने मिलिंद माध्यमिक विद्यालयात शैक्षणिक साहित्याचे वाटप



परळी वैजनाथ प्रतिनिधी स्व. वंदना नागनाथ पारसेवार प्रतिष्ठान परळीच्या वतीने मंगळवार दि. 24 जून रोजी सकाळी मिलिंद मा. व उ. मा. विद्यालय गणेशपार रोड येथे शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला.

विद्यार्थ्यांमध्ये शिक्षण घेण्याची जिद्द निर्माण व्हावी, शैक्षणिक साहित्याअभावी विद्यार्थी अभ्यासापासून दूर जाऊ नये, त्यांच्यातील आत्मविश्वास वाढावा या उद्देशाने स्व. वंदना नागनाथ पारसेवार प्रतिष्ठान मागील काही वर्षापासून वंदनाताईंच्या स्मृती प्रित्यर्थ शैक्षणिक साहित्य वाटपाचे काम करत आहे.

रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, 10 वी,12 वीच्या परीक्षेत छान यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करणे, सत्कार सोहळे आयोजित करणे असे विविधांगी कार्यक्रम हे प्रतिष्ठान सतत करत असते. आज मिलिंद मा. विद्यालयात विद्यार्थ्यांना वह्या व पेन वाटप करून प्रतिष्ठानचे अध्यक्ष पान 3 वर

# गाववाल्यांनो शाळेकडे लक्ष द्या भोगलवाडी जिल्हा प प्रा उच्च माध्यमिक शाळा बंद पडण्याच्या मार्गावर




धारूर ( बाबुराव तिडके ) निजामकालिन असणारी भोगलवाडी येथिल जिल्हा परिषदेचेची फार जुनी शाळा आहे एकेकाळी बीड जिल्हा शिक्षण विभागामध्ये हि शाळा गुणवत्ता मध्ये पहिली आली होती विद्यार्थी संख्या असंख्य होती पण आता शिक्षणा मध्ये स्पर्धा असल्याने संस्थेच्या गाड्या दारात येत असल्यामुळे पालकांचाही जास्त कल जिल्हा परिषद शाळेकडे न दिसता विद्यार्थ्याला हायफाय शिक्षण देण्यासाठी संस्थेकडेच जास्त कल दिसुन येतो चालु घडामोडी मध्ये भोगलवाडी येथिल जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये बोटावर मोजण्या एवढेच विद्यार्थी दिसतात हि शाळा पहिली ते दहावी पर्यंत आहे आठवी नववी व दहावी या वर्गामध्ये तर विद्यार्थी अत्यअल्पच दिसतात तज्ञ शिक्षक पान 3 वर

# महाराष्ट्रात दोन ठिकाणी महापुरुषांची विठंबनेस कारणीभूत समाजकंठकास कठोर शिक्षा करा-- पुरोगामी पत्रकार संघ



बीड | प्रतिनिधी महाराष्ट्रात नुकत्याच पनवेल आणि चाकूर (जि.लातूर) या दोन ठिकाणी महापुरुषांची विटंबना झालेल्या घटना समोर आल्या आहेत. या दोन्ही घटनेतील आरोपींना कठोर शासन करण्याची मागणी राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ शाखा केजच्या वतीने केज तहसिलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पनवेल शहरात असलेला भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णकृती पुतळ्याचे एका समाजकंटकाने विटंबना करण्याचा प्रयत्न केला व चाकूर (जि.लातुर) येथे भूमि अभिलेख कार्यालयात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची विटंबना करणाऱ्या त्या समाजकंटकावर प्रशासनाने कठोरात कठोर शिक्षा पान 3 वर

# शासनाने दिली पुस्तके, सरपंचांनी वाटले दप्तर



वडवणी प्रतिनिधी वडवणी तालुक्यातील रुई गावचे सरपंच मयूर आंधळे यांनी तालुक्यात आदर्श उपक्रम राबवत पहिल्याच दिवशी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रुई येथे विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप करत पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले आहे. या आगळ्या वेगळ्या उपकरणामुळे सरपंच मयूर आंधळे यांचे तालुकाभर कौतुक केले जात आहे. पान 3 वर